सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २३९ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### पुतिन भारत दौऱ्यावर
नवी दिल्ली रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन आजपासून दोन दिवसीय भारत दौऱ्यावर आहेत. दौऱ्यादरम्यान ऊर्जा, संरक्षण आणि द्विपक्षीय व्यापार या महत्त्वाच्या विषयांवर व्यापक चर्चा केली जाणारेय. त्यामध्ये प्रामुख्याने रशियन तेल, क्षेपणास्त्र प्रणाली आणि लढाऊ विमानांची खरेदी यांचा समावेश असेल.

### निवडणूक आयोगाने बोलावली बैठक
**मुंबई :** राज्य निवडणूक आयोगानं आज सर्व पालिका आयुक्तांची बैठक बोलावली आहे. पालिका निवडणुकींच्या तयारी संदर्भात तसंच मतदार याद्याबाबत आज बैठकीत चर्चा होणार असल्याची माहिती समोर येत आहे. मोठ्या प्रमाणात मतदार याद्यांमध्ये त्रुटी असल्याने पुढे काय करायचं याबाबत बैठक होणार असल्याची माहिती आहे.

### राज्यातील शाळा आज बंद राहणार
**पुणे :** राज्यातील शाळा आज बंद राहणार आहेत. शिक्षक आणि शिक्षकेतर संघटनांनी शाळा बंद आंदोलनाची हाक दिली आहे. टीईटी निर्णयावरील पुनर्विचार याचिका तातडीनं दाखल करावी, तसंच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरतीसह अनेक प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर संघटना जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढणार आहेत. आंदोलनात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होतील अशी अपेक्षा आहे.

### राज ठाकरे अचानक दिल्ली दौऱ्यावर
**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर असणार आहेत. आज राज ठाकरे दिल्लीकडे जाणार आहेत. त्यांच्या दिल्ली दौऱ्याचे कारण राजकीय नसून कौटुंबिक आहे. राज यांची सून मिताली ठाकरे यांचे भाऊ डॉ. राहुल बोरुडे यांचे लग्न ५ डिसेंबर रोजी दिल्लीमध्ये पार पडणार आहे. या सोहळ्याला राज ठाकरे यांच्यासह ठाकरे परिवारातील जवळचे नातेवाईक उपस्थित राहणार आहेत.

# महाराष्ट्राच्या भाजप खासदारांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील भाजप खासदारांची आज पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबतची बैठक पार पडली. आज सकाळी १० वाजता केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत बैठक झाली त्यानंतर १० वाजून २५ मिनिटांनी सर्व खासदार पंतप्रधानांच्या दालनात दाखल झाले. संसदीय कामातील सहभाग तसेच पक्ष, राजकीय परिस्थितीवर या बैठकीमध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे. काल संसदेत गणपूर्ती झाली नव्हती त्यामुळे बेल वाजली. तर लोकसभेचा कोरम पूर्ण झाला नाही हे सरकाराचे अपयश समजले जाते, त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वरीष्ठ मंत्र्यांकडे नाराजी व्यक्त केली होती. संसदीय कामकाजातील सहभाग वाढावा, फ्लोअर मॅनेजमेंट व्यवस्थित असले पाहिजे. खासदारांचे सध्याच्या मंत्रीमंडळाविषयी मत काय आहे, याचाही कानोसा पंतप्रधानांनी घेतल्याची माहिती आहे. भविष्यात विविध राज्यातील भाजप खासदारांची भेट पंतप्रधान अधिवेशनादरम्यान घेण्याची शक्यता आहे.





महाराष्ट्रातील सर्व भाजप खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी लोकसभा आणि राज्यसभेमधील भाजपचे खासदार उपस्थित होते, यावेळी पंतप्रधान मोदींनी संसदीय कामकाज यातील सहभाग आणि सरकारची प्रतिमा, खासदार करत असलेली काम याबाबतची चर्चा केली, सध्याच्या राजकीय परिस्थितीवर त्यांनी त्यांची मत देखील जाणून घेतली. त्याचबरोबर संसदीय कामकाजात सहभाग घेणे, सक्रिय सहभाग नोंदवणे, याबाबत सर्व खासदारांचा मत लक्षात घेण्यात आलं. सकाळी दहा वाजता पहिल्यांदा पियुष गोयल यांच्या दालनामध्ये सर्व खासदार एकत्रित जमले होते, तिथून पुढे हे सर्व खासदार दहा वाजून २५ मिनिटांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीसाठी त्यांच्या दालनात पोहोचले.

मिळालेल्या माहितीनुसार काल गणपूर्ती होऊ शकलेली नव्हती, लोकसभेचे कोरम पूर्ण झालेला नव्हता, त्यामुळे बेल वाजली. जेव्हा लोकसभेमध्ये कोरम पूर्ण होत नाही बेल वाजवावी लागते, तर हे सरकारी पक्षाचं अपयश समजलं जातं, लोकसभेच्या सभागृहात किमान ५० खासदार तरी कामकाजासाठी उपस्थित असावे लागतात, आणि काल भाजपाचे खासदार आणि सत्ताधारी पक्षांचे खासदार खूप कमी संख्येने उपस्थित होते, त्यामुळे कोरम पूर्ण झाला नाही. या सर्व बाबतीत एक व्यवस्थित फ्लोअर मॅनेजमेंट असला पाहिजे, याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वरिष्ठमंत्र्यांकडे नाराजी देखील व्यक्त केली अशी माहिती समोर आली आहे, त्याचबरोबर नरेंद्र मोदी हे इतर राज्यातील खासदारांची अशाच प्रकारे संवाद साधणार असल्याचं आणि भेटणार असल्याची माहिती आहे.

कोणकोणते खासदार उपस्थित होते?

संसदेतील पंतप्रधान कार्यालयात ही बैठक पार पडल्याची माहिती आहे. या बैठकीला राज्यसभा आणि लोकसभाचे भाजप खासदार उपस्थित होते. यामध्ये राज्यसभेतून धनंजय महाडीक, अनिल बोंडे, भागवत कराड, अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी, अजित गोपछडे, धैर्यशील पाटील, उज्ज्वल निकम तर लोकसभेतून नितीन गडकरी, नारायण राणे, मुरलीधर मोहोळ, हेमंत सावरा, अनुप धोत्रे, स्मिता वाघ, पियुष गोयल उपस्थित होते. पंतप्रधानांच्या बैठकीपूर्वी पियुष गोयल यांच्या कार्यालयात महाराष्ट्रातील भाजप खासदारांची बैठक पार पडली आहे. त्यानंतर पियुष गोयल यांच्यासोबत सर्व खासदार पंतप्रधान मोदींच्या भेटीला दाखल झाले होते.





# अपघातात चार प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचा जागीच मृत्यू

**भरधाव कारची ट्रकला धडक; वेगामुळे झालेल्या अपघातात चौघांचा दुर्दैवी अंत**

**अमरोहा :** भीषण अपघातात चार प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचा जागीच मृत्यू झालाय. हे चार तरुण कारने प्रवास करत होते, यादरम्यान त्यांच्या भरधाव कारची रस्त्याशेजारी उभ्या असलेल्या ट्रकला धडक बसली आणि त्यांचा मृत्यू झाला. उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यामध्ये बुधवारी (३ डिसेंबर २०२५) ही घटना घडलीय.

मृत पावलेले चारही तरुण वेंकटेश्वरा विद्यापीठातून वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षण घेत होते. मिळालेल्या माहितीनुसार, अमरोहा जिल्ह्यातील रजबपूर पोलीस ठाणे क्षेत्रातील उड्डाणपुलाजवळ बुधवारी रात्री जवळपास १० वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. वेगवान कार आणि ट्रकची धडक इतकी भीषण होती की कारचा पूर्णपणे चेंदामेंदा झालाय. कारमधून मृतदेह बाहेर काढण्यासाठी खूप तास लागले.

मृत पावलेले प्रशिक्षणार्थी डॉक्टर मेरठहून गाझियाबादच्या दिशेनं प्रवास करत होते. प्रवासादरम्यान रस्त्याच्या कडेला उभा असलेला सामानाने भरलेला ट्रक त्यांना दिसला नसावा, असा अंदाज व्यक्त केला जातोय. भीषण अपघातात या चारही तरुणांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या गाडीचा पूर्णपणे चुराडा झालाय. अपघातग्रस्त वाहनाचे भाग कापून मृतदेह बाहेर काढण्यात आले. घटनेनंतर ट्रक चालक फरार झालाय.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झालं आणि कारमध्ये अडकलेले मृतदेह तातडीने बाहेर काढण्यास सुरुवात केली. अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या मदतीने महामार्गावरुन हटवण्यात आलं. पोलिसांच्या माहितीनुसार, कोणताही सिग्नल न देताच ट्रक रस्त्यावर पार्क करण्यात आला होता. अपघात होण्यामागे हेच कारण असल्याचं म्हटलं जातंय.

# फक्त १५ रुपयांत मिळणार डिजिटल ७/१२

**मुंबई :** महाराष्ट्राच्या महसूल विभागात डिजिटल क्रांतीचा महत्त्वपूर्ण टप्पा पार पडला आहे. डिजिटल ७/१२ उताऱ्याला अखेर राज्य सरकारने कायदेशीर मान्यता दिली असून हा निर्णय जाहीर होताच नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश काढत डिजिटल सातबारा, ८-अ आणि फेरफार उतारे आता पूर्णपणे वैध मानण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी राज्य सरकारने अधिकृत परिपत्रकही जारी केले असून या निर्णयामुळे कोट्यवधी शेतकरी व नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाला मोठा दिलासा मिळणार आहे.



**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा मोठा निर्णय**

नवीन नियमांनुसार, नागरिकांना आता केवळ १५ रुपयांचे शुल्क भरून महाभूमी पोर्टलवरून अधिकृत डिजिटल ७/१२ उतारा मिळू शकणार आहे. विशेष म्हणजे या डिजिटल उताऱ्यावर तलाठ्याची स्वाक्षरी किंवा शिक्क्याची आवश्यकता राहणार नाही. डिजिटल स्वाक्षरी, क्यूआर कोड आणि १६ अंकी पडताळणी क्रमांकामुळे हे उतारे स्वतःच कायदेशीरदृष्ट्या वैध ठरणार असून सर्व सरकारी, निमसरकारी, बँकिंग व न्यायालयीन व्यवहारात ते अधिकृत मानले जाणार आहेत.

अनेक वर्षांपासून नागरिकांना तलाठी किंवा सज्जा कार्यालयात जाऊन वारंवार चकरा मारून सातबारा मिळवावा लागे. काही ठिकाणी अधिकृत उताऱ्यासाठी चिरीमिरी देण्याच्या तक्रारीही समोर येत असत. या नव्या परिपत्रकामुळे या सर्व अडचणींवर पूर्णविराम लागला आहे. महसूल मंत्री बावनकुळे यांनी गेल्या एका वर्षात महसूल विभागातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावल्याने त्यांची कार्यशैली राज्यभर चर्चेत आहे.

# कार्यावरील विश्वासामुळेच संघाला भरभरून साहाय्य

## धर्मजागरण विभागाच्या कार्यालयाचे पुण्यात भूमिपूजन

**पुणे :** समाजासाठी आणि देशासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते निःस्वार्थीपणे गेली शंभर वर्षे काम करत आहेत. या कार्यामुळेच संघाबद्दल समाजामध्ये विश्वास निर्माण झाला आहे. या विश्वासामुळे समाज संघाला भरभरून साहाय्य करत आहे, असे प्रतिपादन संघाच्या अखिल भारतीय धर्मजागरण गतिविधीचे समन्वयक शरदराव ढोले यांनी केले. धर्मजागरण गतिविधीचे अखिल भारतीय कार्यालय पुण्यात बांधले जाणार असून या प्रकल्पाचे भूमिपूजन ढोले यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते.



संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. सुरेश उर्फ नाना जाधव, महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, पर्वती भागाचे संघचालक अॅड. चंद्रशेखर कुलकर्णी, ज्येष्ठ कार्यकर्ते दिवाकर पांडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मित्रमंडळ सोसायटीमध्ये 'अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान'तर्फे मुद्रिका बंगला येथे हा कार्यालय बांधकाम प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

धर्मजागरण विभागाचे काम देशभरात वाढत आहे. त्यामुळे कार्यालयांचीही गरज निर्माण झाली आहे. पुण्यात कार्यालयाची जी इमारत तयार होईल त्यात अध्ययन, संशोधन, संस्था सक्षमीकरण, कार्यकर्ता प्रबोधन, कार्यकर्ता प्रशिक्षण अशा अनेक योजना चालवल्या जातील. प्रशिक्षणाचे अनेक विषय या कार्यालयाच्या माध्यमातून सुरू केले जातील, अशी माहिती ढोले यांनी दिली.

संघ प्रेरणेतून चालणाऱ्या संस्थांना जो निधी किंवा ज्या वास्तू देणगीरूपाने दिल्या जातात, त्यांचा उपयोग योग्य त्याच कारणांसाठी होतो, हा विश्वास समाजात निर्माण झाला आहे. समाजाला बरोबर घेऊनच संघ यापुढेही काम करत राहील, असेही ढोले यांनी सांगितले.

कै. वासुदेवराव आणि कै. कमलताई गोखले या दाम्पत्याच्या दातृत्वाबद्दलची माहिती अॅड. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी दिली. गोखले यांनी त्यांचा मित्रमंडळ सोसायटीतील बंगला अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठानला देणगी स्वरूपात दिल्यामुळेच त्या जागी नवी वास्तू साकारत आहे, असे कुलकर्णी म्हणाले.

सेवा आणि समाजोपयोगी उपक्रम चालावेत या अपेक्षेने जी वास्तू देणगी स्वरूपात देण्यात आली आहे, त्याच अपेक्षेप्रमाणे या वास्तूचा उपयोग केला जाईल, असा विश्वास प्रा. नाना जाधव यांनी व्यक्त केला.

नितीन कमळापूरकर, शिरिष किराड, हेमंत हरहरे यांनीही मनोगत व्यक्त केले. मिलींद वाईकर यांनी सूत्रसंचालन केले.



भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.
लिंक्ड इन्श्युरन्स प्रॉडक्ट्स् हे परंपरागत इन्श्युरन्स प्रॉडक्ट्स् पेक्षा वेगळे असतात आणि हे जोखिम घटकांच्या अधीन असतात.
लिंक्ड इन्श्युरन्स पॉलिसीज् मध्ये भरण्यात येणारे प्रिमियम हे बाजारपेठेतील भांडवल आणि जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्याशी संबंधित गुंतवणूकीच्या जोखमींच्या अधीन असतात. फंडाची कामगिरी आणि भांडवली बाजारपेठ/जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्यावर परिणाम करणारे घटक यांच्या आधारे युनिट्सचा एनएव्ही कमी जास्त होऊ शकतो आणि विमाधारक व्यक्ती ही त्याच्या/तिच्या निर्णयासाठी स्वत:च जबाबदार असते. लाइफ इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे केवळ लाइफ इन्श्युरन्स कंपनीचे नाव आहे आणि प्रोटेक्शन प्लस हे केवळ संलग्न इन्श्युरन्स कॉन्ट्रॅक्टचे नाव आहे आणि त्यातून कॉन्ट्रॅक्टची गुणवत्ता, त्याच्या भविष्यातील संभावना किंवा परतावे या गोष्टी कोणत्याही प्रकारे सूचित होत नाहीत.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आज लातुरात शिक्षक संघटनेचा मोर्चा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ डिसेंबर :** शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी लातुरात जिल्हा परिषद शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने मोर्चा काढण्यात येणार आहे.

हा मोर्चा दुपारी एक वाजता शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क पासून जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या आयोजनासाठी समन्वय समितीचे समन्वयक सुनीलकुमार हाके, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष शरद हुडगे यासह संघटनेचे पदाधिकारी प्रयत्नशील होते. या मोर्चाला पोलीस प्रशासनाने अखेर काही अटींसह परवानगी दिली आहे. त्यामुळे आता शुक्रवारी दुपारी हा मोर्चा निघणार आहे. मोर्चादरम्यान वाहतुकीला कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या मोर्चात जास्तीत जास्त शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान मोर्चात शिक्षक सहभागी झाल्याने शाळा बंद राहिली तर ज्या शाळा बंद राहतील त्या शाळातील शिक्षकांचे एक दिवसाचे वेतन कपात करण्याच्या सूचना शिक्षण उपसंचालकांनी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



# राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेतून नवोदित कलाकारांना संधी मिळाली

## नटवर्य श्रीराम गोजमगुंडे राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या समारोपप्रसंगी माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड यांचे प्रतिपादन







**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ डिसेंबर :** नटवर्य श्रीराम गोजमगुंडे राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा मोहोरलेला समारोप यंदा एका वेगळ्याच कलरसिक वातावरणात पार पडला. रंगभूमीवर उमलणाऱ्या नव्या कलेच्या कळ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या स्पर्धेत गुणगुणणाऱ्या प्रतिभेचा गौरव करण्यासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ आणि सर्वांच्या लाडक्या अभिनेत्री विशाखा सुभेदार यांच्या हस्ते बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. त्यांच्या उपस्थितीने संपूर्ण सभागृहात एक उत्साहाची ऊर्मी पसरली, तर कलाकारांच्या चेहऱ्यावर नव्या उमेदेची प्रकाशरेषा दिसून आली.

समारोप सोहळ्याचा एक अनोखा आणि हृदयस्पर्शी क्षण म्हणजे प्रथम पुरस्कारासाठी दिलेली ५१,०००/- रुपयांची देणगी. दादा बळीराम शिवराम गायकवाड यांच्या पवित्र स्मरणार्थ, त्यांच्या कुटुंबीयांची समाजाशी असलेली अतूट नाळ जपणारे, आणि कलावंतांच्या पाठीशी सदैव उभे राहणारे माजी खासदार डॉ. सुनील बळीराम गायकवाड यांनी हा पुरस्कार प्रदान केला. त्यांच्या या योगदानातून केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर कलावंतांच्या कष्टांना आदर आणि संवेदनेची उबही व्यक्त झाली.

या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची गौरवास्पद उपस्थिती लाभली. अभिनेत्री विशाखा सुभेदार, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, प्रदीप पाटील खांडापूरकर, धनंजय बेंबडे, संभाजीराव सुळ, शहर संघ चालक राजेश्वर बेंबडे, आविष्कार गोजमगुंडे, अजय गोजमगुंडे, अमोल नानंजकर, डॉ. रमेश भराटे यांची उपस्थिती सोहळ्याला अधिकच दिमाखदार बनवणारी ठरली.

उपस्थित मान्यवरांनी स्पर्धेत झळकलेल्या विविध प्रयोगांचे कौतुक करताना तरुण कलाकारांच्या कलात्मकतेचे भरभरून अभिनंदन केले.

नटवर्य श्रीराम गोजमगुंडे यांच्या नावाने घेतली जाणारी ही स्पर्धा म्हणजे केवळ रंगभूमीचा उत्सव नाही, तर गाव-शहरातील नवोदित कलाकारांना दिले जाणारे स्वप्नांचे व्यासपीठ आहे. त्यांच्या कलेचा गौरव करताना, समाजातील ज्येष्ठ कलावंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी दिलेली साथ म्हणजे या स्पर्धेच्या यशामागील खरी प्रेरणाशक्ती आहे.

कलायात्रेच्या या मंगल क्षणी प्रत्येक कलावंताच्या डोळ्यांत चमकत होता तो त्याच्या कलेवरील विश्वास, तर सभागृहात रेंगाळत होता रंगभूमीच्या संस्कारांचा गंध. हे बक्षीसवितरण म्हणजे केवळ पुरस्कारांचा सोहळा नव्हता, तर सृजनशीलतेला मिळालेलं प्रेम, प्रोत्साहन आणि आश्वासन होतं. अशा भावनिक आणि भारदस्त वातावरणात स्पर्धेचा समारोप झाला आणि रंगभूमीवरील नव्या पिढीला नवचैतन्य देत, पुढील वर्षाच्या स्पर्धेची उत्सुकता आजच पेटली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते.

## ४३ बाक्स बंदी असलेले प्लास्टिकचा साठा जप्त; ५ हजारांचा दंड वसूल



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ डिसेंबर :** काल बुधवार, दि.४ डिसेंबर २०२५ रोजी आयुक्त श्रीमती मानसी मॅडम यांच्या आदेशावरून तसेच उपायुक्त वसुधा फड स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांतजी पिडगे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलिम शेख, क्षेत्रिय अधिकारी रवि कांबळे यांच्या उपस्थितीत रिंग रोड या भागात बंदी असलेले प्लास्टिक वाहतूक करत असलेल्या एका वाहनावर छापा टाकण्यात आला.

यामध्ये बंदी असलेले एकूण ४३ बाक्सेस अंदाजे ६०० किलो प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला.

या मोहिमेत मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक प्रदिप गायकवाड, अशिष साठे, महादेव फिस्के व कर्मचारी उपस्थित होते

## शहरात रस्ते सफाईसाठी महापालिकेची स्वच्छता मोहीम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ डिसेंबर :** लातूर शहरातील सर्व मुख्य रस्त्यावर पडणारा कचरा व रस्त्याच्या साफसफाई ला प्राधान्य देत लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी यांच्या सूचनेनुसार उपायुक्त वसुधा फड यांनी विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले असून सदरील मोहिम पुढील २ दिवस नियमितपणे सुरू ठेवून शहरातील सर्वच मुख्य रस्ते सफाई व मुख्य रस्त्यावरील डिव्हायडरच्या बाजूची माती काढणे तसेच रस्त्याच्या बाजूचा कचरा साफसफाईचे नियोजन करण्यात आले आहे.

गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजीव गांधी चौक या भागामध्ये सदर मोहीम राबविण्यात आली.

ज्यामध्ये महानगरपालिकेचे १०० सफाई कर्मचारी एकत्र करून सदर मोहीम राबविण्यात आली. सदरील कामाची पाहणी करण्यासाठी स्वतः उपायुक्त वसुधा फड या सकाळी ६ पासून शहरात फिरत असून त्यांच्या समवेत मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे हे देखील उपस्थित होते. वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी करून स्वच्छतेच्या कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

तसेच उद्या दि.०५.१२.२०२५ रोजी




छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नवीन जिल्हाधिकारी कार्यालय बार्शी रोड या मुख्य रस्त्यावर सदरील मोहिमेचे आयोजन करण्यात तेणार आहे. ज्या मध्ये उपायुक्त, मुख्य स्वच्छता अधिकारी, स्वच्छता विभाग प्रमुख, मुख्य स्वच्छता निरीक्षक, सर्व स्वच्छता निरीक्षक, मुकादम, सफाई कामगार, कचरा उचलण्यासाठी ट्रॅक्टर व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

## मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये दिव्यांग दिन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ डिसेंबर :** लातूर येथील श्री साई मंदिरासमोरील, विशाल नगर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व त्यांनी जागतिक दिव्यांग दिनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

यावेळी शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी जागतिक दिव्यांग दिन विषयी माहिति सांगितली. जागतिक दिव्यांग दिन विद्यार्थ्यांमध्ये दिव्यांगाविषयी जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने साजरा केला जातो. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी हेलन केलर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. शाळेच्या शिक्षिकांनी जागतिक दिव्यांग दिनाच्या विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्र संचलन शाळेच्या शिक्षिका प्रणिता सुरवसे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

## जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठीची नागरिकांची हेळसांड थांबणार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेत जन्म मृत्यू प्रमाणपत्रासाठी नागरिकांना सातत्याने ताटकळत रांगेत थांबावे लागत होते. या कामात शिस्त आणि सुसूत्रता आणण्यासाठी मनपा आयुंक्तानी एक निबंधक आणि चार उपनिबंधकांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे आगामी काळात नागरिकांची जन्म - मृत्यू प्रमाणपत्रासाठीची नागरिकांची हेळसांड थांबणार आहे.

मनपा कार्यालयात या प्रमाणपत्रासाठी नेहमीच गर्दी होताना दिसून येत होते. शासनाने आता अनेक योजनेसाठी जन्म प्रमाणपत्र सक्तीचे केल्याने नागरिकांची नियमितच मनपा आवारातील जन्म मृत्यू नोंदणी कार्यालयासमोर गर्दी होताना दिसून येते. या कमला मनपा प्रशासनाने शिस्त लावण्याचा प्रयत्न करावा आणि नागरिकांची होणारी ससेहोलपट थांबवावी,अशी मागणी केली जात होती. मनपा आयुक्तांनी त्यादृष्टीने पाऊले उचलून आरोग्य संचालकांकडे प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे मनपात या विभागासाठी अधिकारी - कर्मचारी नियुक्तीला आता गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मनपा आयुक्त मानसी मीना यांनी नुकतेच एक निबंधक आणि चार उपनिबंधकाच्या नियुक्तीचे आदेश काढले आहेत. या आदेशान्वये मनपाच्या चार क्षेत्रीय कार्यालयांचे क्षेत्रीय अधिकारीच जन्म मृत्यू कक्षाचे उपनिबंधक असणार आहेत. मनपाच्या जन्म मृत्यू विभागात एक निबंधक व १२ कर्मचारी कार्यरत आहेत. नागरिकांची कोणत्याही बाबतीत मनपा प्रशासनाकडून हेळसांड होणार नाही,असा प्रयत्न मनपा प्रशासनाचा असल्याचे मत मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी व्यक्त केले.

## 'जयक्रांती'मध्ये आरोग्य शिबीर



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ डिसेंबर :** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने दिनांक २ व ३ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर येथील प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. सुरेश खमितकर यांच्या उपस्थितीत दोन दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराच्या उद्घाटनावेळी संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, रासेयो व कार्यक्रम अधिकारी डॉ. केशव आलगुले, तसेच डॉ. प्रमोद चव्हाण, डॉ. दिलीप गुंजरगे, डॉ. हरिश्चंद्र चौधरी, डॉ. रामेश्वर स्वामी, डॉ. अविनाश पवार, डॉ. अरुण साळुंखे आणि प्रा. शिवराज बाजुळगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच एम.आर. महेश शिंदे आणि हरी इराबत्ती यांनीही सहभाग नोंदविला.

दोन दिवसीय शिबिरामध्ये ५५ रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर आयुर्वेदिक औषधोपचार करण्यात आले. या तपासणीत सर्दी, ताप, खोकला, सांधेदुखी, गुडघेदुखी, कंबरदुखी, मणक्यांचे विकार, मान व पाठदुखी, पोटाचे विकार, पित्ताशय तक्रारी, स्त्रीरोग, सोरायसिस, त्वचारोग, केसगळती, किडनी व मूत्रपिंडाचे आजार अशा विविध तक्रारींवर उपचार करण्यात आले.

आयुर्वेद साधनांची सुरक्षितता व प्रभावीता अधोरेखित करत, औषधोपचारानंतर शरीराला कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत, त्यामुळे अधिकाधिक रुग्णांनी आयुर्वेदिक औषधांचा अवलंब करावा, असे आवाहन आयुर्वेदाचार्य डॉ. सुरेश खमितकर यांनी शिबिराच्या समारोपावेळी केले. या उपक्रमाचे महाविद्यालयाच्या एनएसएस विभागासह उपस्थित सर्वांनी कौतुक केले. सूत्रसंचालन डॉ. प्रमोद चव्हाणतर आभार डॉ. हरिश्चंद्र चौधरी यांनी मानले.

## नांदगावच्या दत्तनगरीत दत्त जन्मोत्सव उत्साहात साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ डिसेंबर :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या नांदगाव येथील दत्त नगरीतील श्री दत्त मंदिरात गुरुवारी हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत दत्त जन्मोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावर्षीचा हा रौप्य महोत्सवी दत्त जन्मोत्सव होता. या उत्सवामुळे मंदिर परिसरात सगळीकडे दत्तमय वातावरण झाल्याचे पाहावयास मिळाले. हजारो भाविकांनी यावेळी महाप्रसादाचा लाभ घेतला.

नांदगावच्या ओसाड माळरानावर प.पू. गुरुवर्य गुलाबगिरी महाराजांनी २५ वर्षांपूर्वी अक्षरशः नंदनवन फुलवून साक्षात दत्तात्रय महाराजांचे अधिष्ठान असणाऱ्या श्री दत्त मंदिराची मुहूर्तमेढ रोवली होती. पाहता पाहता या दत्तनगरीने आता मनमोहक रूप धारण केले आहे. छोट्याशा मंदिराचे रूपांतर आता भव्य दिव्य , डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या अशा मंदिरात झाले आहे. या मंदिराच्या उभारणीसाठी दत्त संप्रदायाचे परमभक्त





प.पू. गुलाबगिरी महाराजांनी अक्षरशः रक्ताचे पाणी केले आहे. दिवसरात्र परिश्रम घेऊन समाजतील सर्वच स्तरातील भाविक भक्तांकडून मदत मिळवून त्यांनी हे भव्यदिव्य मंदिर उभारले आहे. प्रतिवर्षी दत्तजयंतीच्या औचित्य साधून या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज गुरुचरित्र पारायण सोहळा, भजन - कीर्तन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावर्षीचा सोहळा रौप्यमहोत्सवी असल्याने अतिशय भव्य दिव्य आणि डोळ्यांचे पारणे फेडणारा असा झाला.

या सोहळ्याविषयी आपले विचार व्यक्त करताना प.पू. गुलाबगिरी महाराज म्हणाले की, आजच्या कलियुगात सगळ्यात लवकर प्रसन्न होणारी देवता म्हणून दत्त महाराजांची ख्याती आहे. अंतःकरणातून जो श्री दत्तात्रय महाराजांना शरण जातो, त्याच्या दुःख, वेदनांचे निराकरण तात्काळ होते असा अनेकांचा अनुभव आहे. आजच्या

### हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ; 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'च्या जयघोषाने आसमंत दणाणले

धकाधकीच्या जीवनात मनुष्याला मनःशांती साठी भक्तिमार्गाकडे वळल्याशिवाय पर्याय नाही. कितीही धावपळीचे जीवन असले तरी मानसिक शांतीसाठी अध्यात्माची कास धरावीच लागते. म्हणूनच सद्यस्थितीत सगळ्याच मंदिर - देवस्थानांना मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे पाहावयास मिळते. नांदगावच्या दत्तनगरीतील दत्त मंदिरातही उत्सवाचे सोडा, दर गुरुवारीही भक्तांचा मेळा मोठ्या प्रमाणात जमत असल्याचे लक्षावधी भक्तांनी पहिले आहे, असे सांगून यावर्षीचा रौप्यमहोत्सवी दत्त जन्मोत्सव भक्तियुक्त वातावरणात साजरा झाल्याबद्दल महाराजांनी सर्व भक्त वर्गांचे शतशः आभार व्यक्त केले. यावेळी हजारो भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. 'दिगंबरा दिगंबरा . श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या जयघोषाने अवघे आसमंत दणाणून गेले होते. या उत्सवाच्या यशस्वीतेसाठी प.पू. गुलाबगिरी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख संयोजक विजय पस्तापुरे, सागर कारंजे, प्रशांत पटणे , शिवप्पा कोठीवाले, हरीश सुरेश गिरी, हरिदास गोविंद गिरी, रोहित पाटील, मनोज वाघमारे, रामलिंग अंकलकोटे, तात्यासाहेब देशमुख,सुरेश चव्हाण, श्रीमती प्रगती सुरेश गिरी, भाग्यश्री गिरी, रंजना गिरी, नम्रता सुरेश गिरी, निकिता सुरेश गिरी, अश्विनी कोठीवाले, महादेवी कळबंडे, नीलाबाई काळे, विमलबाई वाघमारे, चिंगूबाई ढमाले, महेश ढमाले, सोहम कोठीवाले, ओमकार ढमाले, भैरव ढमाले, शुभम क्षीरसागर यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### प्रा.सूर्यकांत शिंदे यांना पीएचडी प्रदान




**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या बेसिक अँड अप्लाईड सायन्सच्या भौतिकशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक सूर्यकांत शिंदे यांना पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. प्रा. सूर्यकांत शिंदे यांनी भौतिकशास्त्र विषयात 'स्टडी ऑफ स्कॅटरिंग बिहेविअर ऑफ लूनार सरफेसेस यूज़िंग चंद्रयान - २ पोलॅरिमेट्रिक एसएआर' या विषयावर आपले संशोधन केले आहे. त्यांनी महात्मा गांधी मिशन विद्यापीठातून डॉ.क्रांती झाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आपली पीएचडी पूर्ण केली आहे. प्रा.सूर्यकांत शिंदे यांनी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच.एच.शिंदे, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, संचालिका डॉ. परमिंदर कौर व सर्व संबंधित प्राध्यापक व सहकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### टोयोटा हॉर्नबिल म्युझिक फेस्टिव्हलचे उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने सलग चौथ्या वर्षी टायटल स्पॉन्सर म्हणून जागतिक स्तरावर प्रसिद्ध हॉर्नबिल फेस्टिव्हलदरम्यान टोयोटा हॉर्नबिल म्युझिक फेस्टिव्हल चे उद्घाटन केले. हा म्युझिक फेस्टिव्हल भारतातील सर्वात प्रतिष्ठित सांस्कृतिक उत्सवांपैकी एक असून कलाकारांना त्यांची कला सादर करण्यासाठी एक उत्साही व्यासपीठ उपलब्ध करून देतो. यावर्षीच्या आवृत्तीची सुरुवात जपानच्या ड्रम एन्सेंबल आणि टोयोटाचे ब्रँड ॲम्बेसेडर, ड्रम ताओ यांच्या विशेष सादरीकरणाने झाली, ज्यामुळे संगीत, ऊर्जा आणि सांस्कृतिक अभिमानाचा अद्भुत माहोल निर्माण झाला. हॉर्नबिल म्युझिक फेस्टिव्हलसोबतच्या कंपनीच्या दीर्घकालीन भागीदारीमुळे नागालँड आणि ईशान्य भारताशी असलेले त्यांचे दृढ नाते प्रतिबिंबित होते, ज्याद्वारे या प्रदेशाची सांस्कृतिक परंपरा साजरी करत स्थानिक समुदायांशी संबंध अधिक मजबूत होतात.

### इंडिया बाइक वीक आता डोंगरांच्या कुशीत

**छत्रपती संभाजीनगर :** इंडिया बाइक वीक आकर्षक नव्या स्वरुपात अत्यंत महत्त्वाच्या १२ व्या पर्वासाठी सज्ज झाला आहे. गल्फ सिंट्रेक या उपक्रमाचे प्रायोजक आहेत. अत्यंत कमी वेळात या उपक्रमात प्रचंड संख्येने सहभाग नोंदवण्यात आला आहे. काही बाबी आयोजकांच्या नियंत्रणापलिकडे असल्याने आयबीडब्ल्यू २०२५ आपल्या मूळ स्थानाहून म्हणजेच गोव्यातून महाराष्ट्रात पाचगणीच्या दख्खनी खोऱ्यात आयोजित करण्यात येत आहे. गोव्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुका असल्याने आयबीडब्ल्यूच्या तारखा बदलण्यात आल्या आहेत. धुक्यांनी वेढलेली पठारे आणि नाट्यमय डोंगररांगांमध्ये रंगणाऱ्या आयबीडब्ल्यूमुळे आता पाचगणीला देशभरातील रायडर्ससाठी उंचावरील मैदानाचे स्वरूप येणार आहे. हा सगळा भागच नवा आणि खास बनणार आहे. नवे मार्ग, गार वारे, शेकोटीच्या ऊबेच्या रात्री, कॅंपिंग, आफ्टर पार्टीज आणि अर्थातच खास असा इंडिया बाइक अनुभव. हा आयबीडब्ल्यूचा एक अभूतपूर्व असा महोत्सव असणार आहे.

### फ्रॉड अवेयरनेस वर्कशॉपचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील आघाडीची खाजगी क्षेत्रातील बँक असलेल्या एचडीएफसी बँकने डिजिटल बँकिंग जागरूकता उपक्रमाचा भाग म्हणून छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, छत्रपती संभाजीनगर मध्ये सुरक्षित बँकिंग वर्कशॉपचे आयोजन केले. या वर्कशॉपचा उद्देश शाळेतील विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबद्दल आवश्यक माहिती देणे हा होता.या संवादात्मक सत्रातून ४०० पेक्षा अधिक विद्यार्थी आणि प्राध्यापकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबद्दल महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. सत्रादरम्यान बँकेच्या कर्मचाऱ्यांनी डिजिटल सुरक्षेबाबत सहभागी विद्यार्थी आणि प्राध्यापकांना सखोल माहिती मिळावी यासाठी अनेक महत्त्वाचे विषय समजावून सांगितले.

### मका खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणीला सुरुवात

**गंगापूर :** शासन किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरीप हंगाम २०२५-२०२६ साठी शेतकऱ्यांची ऑनलाईन मका खरेदी नोंदनी चालू झाली असून शासन खरीप मका हंगाम २०२५-२६ चालु झाला आहे.मका नोंदणीसाठी मुख्य कार्यालय गंगापुर मार्केट यार्ड तसेच लासुर स्टेशन, संस्थेचे कार्यालय मार्केट यार्ड मध्ये शेतकऱ्यांची मका खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी चालु झालेली आहे. नोंदणी करण्यासाठी लागणारे कागदपत्र घेवुन संस्थेचे कार्यालय येथे येवुन स्वत: हजर राहुन नोंदणी करावी यासाठी ७/१२ उतारा व ८ अ ऑनलाईन, ऑनलाईन मका पिक पेरा २०२५ २०२६, आधार कार्ड झेरॉक्स, बँक पासबुक झेरॉक्स, मोबाईल नंबर, हमीभाव २४००/- प्रति क्विंटल, हेक्टरी २७.९० क्विंटल, शेतकऱ्याने नोंदणीसाठी समक्ष उपस्थित असणे आवश्यक आहे. सर्वर अभावी मका नोंदणीला उशीर लागल्यास सहकार्य करावे.तसेच गंगापुर व लासुर स्टेशन येथे शेतकऱ्यांनी आपली ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी असे आवाहन संस्थेचे सभापती लक्ष्मण मुरलीधर पा. भुसारे, उपसभापती आप्पासाहेब रंगनाथ पा.पाचपुते व संचालक मंडळ यांनी केले आहे.

### भीमराव सोनवणे यांचे निधन

**सोयगाव :** तालुक्यातील गलवाडा (अ) येथील रहिवाशी



डॉ.भीमराव शंकर सोनवणे (वय ७५ वर्ष) यांचे बुधवार (दि.३) रोजी निधन झाले. त्याच्यावर (दि.४) गुरुवारी दुपारी १.३० वा. गलवाडा (अ) येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते गलवाडा गावाचे पोलीस पाटील मिलिंद सोनवणे यांचे मोठे भाऊ होत.

### शेण फडाबाई बर्डे यांचे निधन

**सिल्लोड :** तालुक्यातील मंगरूळ येथील रहिवाशी शेण फडाबाई



नामदेव बर्डे वय १०५याचे बुधवारी ता.३ निधन झाले. त्यांच्यावर दुपारी तीन वाजता मंगरूळ येथे त्यांच्या मळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी असा मोठा परिवार आहे. आईचा एक नातू आरोग्य सेवक तर एक नातू देश सेवेसाठी काम करतो. त्यांच्या अंत्यसंस्काराला कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामदास पालोदकर, सरपंच उपसरपंच व नागरिक हजर होते. गावातील प्रतिष्ठित शेतकरी सयाजी बर्डे यांच्या त्या आई होत.

# पदवीधर मतदार संघ प्रारुप मतदारयादी प्रसिद्ध

## औरंगाबाद विभागात एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार



**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३ :** भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदर सुधारीत कार्यक्रमानुसार मतदारयादीच्या प्रारूप प्रसिध्दीचा दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ (बुधवार) होता. त्यानुसार प्रारुप मतदार यादी आज प्रसिध्द करण्यात आली.

विभागीय आयुक्त कार्यालयात या कार्यक्रमावेळी विभागीय आयुक्त तथा ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ मतदार नोंदणी अधिकारी जितेंद्र पापळकर, अपर आयुक्त सामान्य प्रशासन तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी श्रीमती मंजुषा मिसकर यांच्यासह तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ४६ हजार ४०६ पुरूष, १५ हजार ९०८ महिला व ४ तृतीयपंथी असे एकूण ६२ हजार ३१८ मतदार आहेत. जालना जिल्ह्यात एकूण २३ हजार ६४८ पुरूष, ५ हजार २७२ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २८ हजार ९२२ मतदार आहेत. परभणी जिल्ह्यात १६ हजार ६३५ पुरूष, ४ हजार ६४ महिला तर १ तृतीपंथी असे एकूण २० हजार ७०० मतदार आहेत. हिंगोली जिल्ह्यात ६ हजार ४७६ पुरूष, १ हजार ५२८ महिला असे एकूण ६ हजार ४ मतदार आहेत. नांदेड जिल्ह्यात २३ हजार ८६७ पुरूष, ६ हजार २६४ महिला तर ४ तृतीयपंथी असे एकूण ३० हजार १३५ मतदार आहेत. लातूर जिल्ह्यात १७ हजार ४९२ पुरूष, ४ हजार ९९३ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २२ हजार ४८७ मतदार आहे. धाराशिव जिल्ह्यात १६ हजार ७६२ पुरूष, ४ हजार ४७ महिला असे एकूण २० हजार ८०९ मतदार आहेत. बीड जिल्ह्यात ३४ हजार ४८५ पुरूष, ९ हजार ६८७ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण ४७ हजार १७४ मतदार आहेत. विभागातील आठही जिल्ह्यात एकूण १ लाख ८८ हजार ७७१ पुरूष, ५१ हजार ७६३ महिला तर १५ तृतीयपंथी असे एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार आहेत. पुढील अत्यंत महत्वाचा टप्पा, म्हणजेच दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (कलम १२ अन्वये) हा दिनांक ०३ डिसेंबर २०२५ (बुधवार) ते १८ डिसेंबर २०२५ (गुरुवार) असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या सर्व दावे व हरकती दिनांक ०५ जानेवारी, २०२६ पुर्वी निकाली काढण्यात येणार आहेत. अंतिम मतदार यादी प्रसिद्धी दिनांक १२ जानेवारी, २०२६ (सोमवार) असा निश्चित करण्यात आला असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

# मार्शल आर्ट प्रशिक्षक घुगे यांची निवड

**तभा.वृत्तसेवा**

**बिडकीन, दि.४ डिसेंबर :** तभा वृत्तसेवा बिडकीन दि ४ डिसेंबर मार्शल आर्ट प्रशिक्षक पवन विश्वनाथ घुगे याची विभागीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



ही निवड महाराष्ट्र राज्य बुडो मार्शल आर्ट संघटनेचे अध्यक्ष लहू पारवे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

पवन घुगे यानी हजारो मुला मुलींना युतींना छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये व ग्रामीण भागामधील मुला मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले आहे. तसेच जिल्हा राज्य राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडूंना मार्गदर्शन करून घडवले आहे. मार्शल आर्टस क्रीडा क्षेत्रामध्ये गेल्या वीस ते पंचवीस वर्षांपासून पवन घुगे सक्रिय आहेत व दि बुडो मार्शल आर्ट म्युचर असोसिएशन ऑफ छत्रपती संभाजी नगर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष आहेत, त्यांची क्रीडा क्षेत्रातील कामाची उल्लेखनीय दखल घेत ही निवड करण्यात आली आहे.

सध्या ते डिव्हाईन चाइल्ड कॉन्व्हेंट सीनियर सेकंडरी स्कूल बिडकीन येथे क्रीडा प्रशिक्षक आहेत. याबद्दल मुख्याध्यापिका जिना चाको, पदाधिकारी शिक्षक, बुडो मार्शल आर्टचे जिल्हा संघटनेचे सचिव प्रविण घुगे, संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ, दिलीप देवळाणकर, ॲड. दत्ता भांगे, मराठवाडा अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस आदीसभा व्यवस्थापन परिषद सदस्य, सुमित त्रिवेदी, शिवसेना तालुकाप्रमुख पश्चिम विधानसभा स्वेताताई त्रिवेदी, अंकुश नरवडे, प्रजय इंगोले, संघटक प्रशिक्षिका राधा घुगे, नंदा घुगे, कोमल राठोड, धनश्री शिदवडकर, ऋतुजा, अनुश्री घुगे, रणवळकर, प्रशिक्षक राम चौरे, गौरव टोकटे, श्याम बुधवंत, यशोधन घुगे,आदिनी शुभेच्छा दिल्या आहेत.



# ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा दिन

**तभा.वृत्तसेवा**

**बिडकीन दि ३ डिसेंबर :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथे सेठ मोतिलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दिनांक २८ व २९ नोव्हेंबर २०२५ रोजी दोन दिवसीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते रिबन कट करून करण्यात आली. या दोन दिवसांत पिकअप अँड ड्रॉप, लिंबू-चमचा, धावण्याची शर्यत, गोणपाट शर्यत, स्कीपिंग, झिग-झॅग,क्रिकेट, रस्सी खेच, पुस्तक संतुलन तसेच कबड्डी आणि खो-खो अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या दिवशी बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहेत.

# विद्यार्थी सुरक्षा समितीनिमित्त श्री मोहटादेवी विद्यालयात बैठक

**तभा.वृत्तसेवा**

**बिडकीन, दि.४ डिसेंबर :** पैठण तालुक्यातील श्री मोहटादेवी विद्यालय म्हारोळा येथे विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा समिती २०२५,२०२६, ची विशेष पालक सभा दि २७ नोव्हेंबर रोजी आयोजित केली होती. सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी सविता जाधव, शिवाजी चावरे, शिक्षक प्रतिनिधी सतीश मुखेकर, सुभाष गवई, शिक्षण तज्ञ जागृती बनसोड, आरोग्यसेविका वसुधा चित्ते, अंगणवाडी सेविका कांचन महाजन, ग्रामसेवक गणपत वाले, पोलीस पाटील राजू जाधव, वैद्यकीय अधिकारी गणेश शिंदे, कायदा तज्ञ योगेश महानुभव, माजी विद्यार्थी कार्तिकी गोरे, अंकुश गोरे, शिवाजी राऊत, त्याचबरोबर विद्यालयातील मुख्याध्यापक महेश घोरपडे, दीपक कर्डिले, काकासाहेब मालोदे, सतीश मुखेकर, ज्योती गायकवाड, अंजुम पठाण, प्रशांत शेळके, सुरेश शिंदे, शंकर शिरसाट, रमेश ऋषी, बद्रीनाथ धरपळे, आदींची उपस्थिती होती.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात व्याख्यान

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.४ डिसेंबर :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या रेड रिबन क्लब अंतर्गत एड्स दिनानिमित्त एड्स व थॅलेसेमिया बद्दल मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथील समुपदेशक सुनील वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना एड्स बद्दल समुपदेशन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्हीबद्दल माहिती सांगितली.

त्यांच्या समवेत समुपदेशक अतुल मुळे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे यांनी विद्यार्थ्यांना एड्सबद्दल सखोल मार्गदर्शन केले. ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथील डॉ. अनिकेत घोडके यांनी विद्यार्थ्यांना थॅलेसेमिया या आजाराबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी केलस. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील, प्रा.अनिल मानकर, डॉ. ग्यानबा भगत, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सूत्रसंचालन रासेयोचे डॉ.निलेश गावडे यांनी तर डॉ. निलेश गाडेकर यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयोचे स्वयंसेवक, डॉ.निलेश गावडे, डॉ. पंकज गावित, डॉ. सुनील चौधरे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# सकल दिगंबर जैन वधु-वर परिचय संमेलनाचे आयोजन

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.४ डिसेंबर :** शहरातील परिवर्तन समुह व आर्यनंदी बहुउददेशीय संस्था यांच्या संयुक्त विदयमाने सकल दिगंबर जैन वधु वर परिचय संमेलनाचे आयोजन दिनांक ०७ डिसेंबर रविवार रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत कन्यादान लॉन्स सावंगी फाटा, सावंगी कॅब्रीज रोड या ठिकाणी आयोजीत करण्यात आला असुन संपुर्ण कार्यकमाच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई रसिकलाल धारीवाल पुणे व सुरेंद्र (अप्पु) चंद्रकुमार पाटणी यांच्या सानिध्यात संपन्न होणार आहे.

या प्रसंगी विशेष उपस्थिति खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत अध्यक्ष महावीर पाटनी, सैतवाल दिगंबर जैन समाज अध्यक्ष अमोल मोगले, अग्रवाल दिगंबर जैन समाज अध्यक्ष मुकेश साहूजी सह अन्य मान्यवरांची उपस्थिति ही लाभणार आहे. आज सकल दिगंबर जैन समाजात मुला मुलींची कमतरता मोठया प्रमाणावर दिसुन येत असल्यामुळे शहरात प्रथमच परिवर्तन समुह व आर्यनदी बहुउददेशीय संस्था यांच्या संयुक्त विदयमाने राष्ट्रीय स्तरावर या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

आतापर्यंत या संमेलनात जवळपास ७०० ते ८०० मुला मुलींची रजिस्ट्रेशन झाले आहे.

या परिचय संमेलनात ज्या लोकांनी रजिस्ट्रेशन केले आहे त्या लोकांना उपस्थित राहणे अनिवार्य असुन त्यानी स्वत: उपस्थित रहावे असेही या समितीव्दारे आवाहन करण्यात आले आहे.

**परिवर्तन समूह व आर्यनंदी बहुउद्देशीय संस्था यांचा संयुक्त उपक्रम**

संपूर्ण कार्यकम यशस्वी करण्यासाठी संमेलन अध्यक्ष श्रीमती. शोभाताई रसिकलाल धारीवाल पुणे, सुरेंद्र (अप्पु) चंद्रकुमार पाटणी, भरत धोंगडे, सौ. सपना मोगले, सौ. रश्मी पाटणी, प्रकाश सांगवे, प्रीतम देशमाने, भरत देवधरे, डॉ. शैलेश चांदीवाल, संतोष पापडीवाल, रितेश ठोले, सचिन लोहाडे, प्रो. मनोज कासलीवाल, शरद कासलीवाल, शितल गंगवाल, ॲड. राकेश पाटोदी, प्रो. प्रकाश पापडीवाल, डॉ. रविंद्र कासलीवाल हे प्रयत्न करीत आहे. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

### अभंग

सदा सर्वकाळ । रूप तुझे मनी ।
आनंद जीवनी । बरसतो ।। १ ।।
सदामुखी आहे । गोड तुझे नाम ।
मनाला विश्राम ।चारी काळ ।।२।।
सुख समाधान । अंगणी भेटले ।
कल्याण जाहले । आयुष्याचे ।।३।।
तुझ्याच घरात । देवा तुझा वास ।
तुझा सहवास । भाग्य माझे ।।चार ।।
तुझे रूप मनी । राहो निरंतर ।
नको करू दूर ।कधी मज ।। ५ ।।
कृपा आशीर्वाद । दे मजसी देवा ।
चरणाची सेवा । नित्य घडो ।।६ ।।
तव पदी दत्ता । साष्टांग नमन ।
सफल जीवन । झाले माझे ।। ७ ।।

**– नारायण पांडव, छ संभाजीनगर.**

# श्री क्षेत्र वेरूळ नगरीत बाबाजींच्या धर्मसोहळ्याची सांगता

**खुलताबाद, दि.१ डिसेंबर :** निष्काम कर्मयोगी जगद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या ३६ व्या पुण्यस्मरणानिमित्त वेरूळ येथे २५ नोव्हेंबरपासून प्रारंभ झालेल्या जगद्गुरू जनशांती धर्मसोहळ्याची सांगता मंगळवार, दि. २ रोजी भक्तिमय वातावरणात झाली. श्री बाबाजींचे उत्तराधिकारी जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली हा धार्मिक सोहळा अत्यंत शिस्तबद्ध आणि व्यवस्थित पद्धतीने संपन्न झाला. देशभरातून आलेल्या लाखो भाविकांनी सहभाग नोंदवल्याने वेरूळ नगरी भाविकांनी फुलून गेली.

आठ दिवस चाललेल्या विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमात भाविकांच्या सहभागाने नवीन उच्चांक नोंदवला. राष्ट्रकल्याण आणि सामाजिक उन्नती या उद्देशाने यंदाच्या सोहळ्याला विशेष महत्त्व लाभले. सांगतेच्या दिवशी निघालेल्या भव्य शोभायात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. मुख्य व्यासपीठावर



शांतिगिरीजी महाराज यांच्या हस्ते श्री बाबाजींच्या पादुकांचे पाद्यपूजन करण्यात आले. कमलाकर गुरु शिवपुरी यांनी पौरोहित्याची जबाबदारी पार पाडली.

या सोहळ्यात ११ हजार भाविक अनुष्ठानासाठी बसले होते. त्यांच्या मौनव्रताची सांगता विधिवत झाली. ७५१ कुंडी शिवशक्ती मनोवांच्छित अतीरुद्रस्वाहाकार महायज्ञात २५ हजार भाविकांनी सहभाग नोंदवला. अखंड नंदादीप, अभिषेक, हस्तलिखित जप साधना, नामसंकीर्तन, भागवत पारायण आणि श्रमदान या सर्व उपक्रमांमध्ये भाविकांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

या कालावधीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, मंत्री अतुल सावे, पालकमंत्री संजय शिरसाठ, माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांसह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून आशीर्वाद घेतले. सांगतेच्या दिवशी जालना लोकसभा खासदार डॉ. कल्याण काळे यांनीही भेट दिली. अखेरच्या दिवशी विविध भाविकांनी स्वतःचे ट्रॅक्टर आणून बुंदी आणि मसालेभात महाप्रसादाचे वितरण केले.

### जाहीर प्रगटन

सर्वत्र जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकारानी खाली परिशिष्टामध्ये नमुद केलेली मिळकत कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असुन सदरील मिळकतीचे कायमस्वरूपी नोंदणीकृत खरेदीखत दस्ताऐवज नोंदविणे आहे. सदरील मिळकतीचे अनुषंगाने कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास किंवा सदरील मिळकतीचे अनुषंगाने कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क तथा संबंध असल्यास किंवा सदरील मिळकतीचे अनुषंगाने न्यायालयीन अथवा कार्यालयीन कार्यवाही प्रलंबित असल्यास किंवा सदरची मिळकत कोणत्याही बँकेकडे अथवा वित्तीय संस्थेकडे तारण असल्यास किंवा सदरील मिळकतीचे अनुषंगाने कोणाचाही वाटणी हिस्सा किंवा अन्य प्रकारचे हक्क असल्यास सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे

तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत लेखी स्वरूपात माझे कार्यालयात लेखी कागदपत्रासह पुराव्यासह सादर करावेत. मुदतीमध्ये कोणाचाही आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची मिळकत निर्विवाद व वैध असल्याचे समजुन सदरील मिळकतीचे खरेदीचे व्यवहाराचे अनुषंगाने नोंदणी कार्यालयात नोंदणीकृत दस्ताऐवज नोंदविण्यात येईल याची नोंद घ्यावी. म्हणुन सदरचे जाहीर प्रगटन.

**परिशिष्ट :** मौजे नारायणपुर बु., ता. गंगापुर येथील शेत गट नं. ६ एकुण क्षेत्रफळ २ हे. ४२ आर. आकार १६ रुपये ८७ पैसे खाते नं. ५७१ मधील ४ एकर क्षेत्रफळाची जमीन खालील चतुःसिमेचे आतील पुर्वेस : श्री. भुजंग यांचे शेत शेत गट नं. २३१ मौजे वाळुज बु.पश्चिमेस : सदरील मिळकती मधील उर्वरीत जमीन आणि त्यालगत गट नं. २३० मौजे वाळुज मधील जमीन दक्षिणेस : श्री. भुजंग यांचे शेत - शेत गट नं. २३१ मौजे वाळुज बु उत्तरेस : मौजे वाळुज बु. येथील शेत गट नं. २३२ मधील श्री. उदय रावसाहेब चव्हाण व श्री.दिलीप रावसाहेब चव्हाण यांचे शेत व शेत गट नं. ६ मौजे नारायणपुर मधील रस्ता.

**नोट :** सदरील शेत गट नं. ६ मौजे नारायणपुर ता. गंगापुर या जमीनीमध्ये जाणे येणेसाठी/ वहिती करण्यासाठी म्हणुन शेत गट नं. २३०खाते नं. ६३८७ मौजे वाळुज बु. ता. गंगापुर या जमीनी मधुन पुर्व पश्चिम दिशेने उत्तरेकडील भागाकडील ३० फुट रूंदीचे रस्त्यासह सदरची जमीन माझे पक्षकाराने कायमस्वरूपी खरेदीकरण्याचे ठरविले आहे. म्हणुन सदरचे जाहीर प्रगटन.

**दि. ०२/१२/२०२५** **स्थळ : गंगापूर.**

मार्फत
**ॲड.बी.पी. जोशी**
**गंगापूर, ता गंगापूर जि.संभाजीनगर, मो.नं. ९८९०९००२००**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# राज्य निवडणूक आयोगाचा सावळा गोंधळ

नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीचे वेळापत्रक आणि प्रक्रिया यात अनेक घोळ व गोंधळ करून आपली 'अफाट' अकार्यक्षमता दाखवून देताना राज्य निवडणूक आयोगाने भारतातील निवडणूक कार्यप्रणालीच्या उत्तम इतिहासाला बट्टाही लावला आहे. खरे तर फार मोठा मुद्दा नव्हता. आरक्षणाचे जे कोणते विषय आहेत, त्यांच्या विषयी पुढील वर्षी जानेवारीत निर्णय होतील, हे स्पष्ट झालेले होते. त्यामुळे असा घोळ होण्याचे आणि त्यातून एवढी गुंतागुंत निर्माण होण्याचे काहीही कारण नव्हते. बऱ्याच सव्यापसव्यानंतर व प्रदीर्घ कालावधीनंतर महाराष्ट्रातील नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुका २ डिसेंबरला घेण्याचे ठरले आणि निकाल ३ डिसेंबरला लागणार हेही ठरले. उमेदवारी अर्जांची छाननी, पात्रता-अपात्रता इत्यादी प्रक्रियात्मक विषयांवरून काही ठिकाणी आक्षेप घेतले गेले. काही लोक कोर्टात गेले. त्यामुळे २ तारखेला व्हावयाचे काही ठिकाणचे मतदान राज्य निवडणूक आयोगाने २० डिसेंबरला घेण्याचे ठरविले. २० तारखेला होणाऱ्या मतदानाचे निकाल २१ डिसेंबरला लागतील, असेही ठरले. २० डिसेंबरपर्यंत आक्षेपांचे निराकरण होईल आणि खटलेही संपतील, असे राज्य निवडणूक आयोगाने कशावरून गृहीत धरले हे कळायला मार्ग नाही. हा विषय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे आला असता सारेच निकाल २१ डिसेंबरला लावा, असा आदेश दिला गेला. त्यावरून निवडणूक आयोगावर साऱ्यांकडून टीकेची झोड उठली असेल तर ती अनाठायी म्हणता येणार नाही. नागपूर खंडपीठाने निवडणुकांचा निकाल दोन वेगळ्या तारखांना जाहीर करण्याच्या आयोगाच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केला. मतदार प्रभावित होऊ नयेत आणि निवडणुकीची प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शी असावी, यासाठी एकाच दिवशी निकाल लागणे आवश्यक असल्याचे खंडपीठाचे म्हणणे पडले. ते अतिशय योग्य आहे. या निवडणुकांच्या निकालांना २१ डिसेंबरपर्यंत स्थगिती देण्याचा जो आदेश दिला गेला, तो वरकरणी न्यायालयीन प्रक्रियेचा एक भाग वाटू शकतो. वास्तवात तो राज्य निवडणूक आयोगाच्या अकार्यक्षमतेवर कठोर ताशेरे ओढणारा आहे. खंडपीठाने नेमक्या वेळी दिलेला हा निर्णय म्हणजे लोकशाहीच्या अस्तित्वाला मिळालेला प्राणवायूच. या निर्णयामुळे विरोधकांचे डोळे तर चढले आहेतच. शिवाय सत्ताधारीसुद्धा खट्टू झाले आहेत. विरोधक आणि सत्तापक्ष दोघेही एकाच निर्णयावर नाराज झाल्याचे क्वचितच घडते. ही नाराजी बाजूला ठेवली तरी न्यायालयाने उपस्थित केलेले प्रश्न अधिक मूलभूत आणि महत्त्वाचे ठरतात. काही जागांवर २० डिसेंबर रोजी मतदान होत असताना, ३ डिसेंबरला त्यापूर्वी झालेल्या (२ डिसेंबरच्या) निवडणुकांचे निकाल जाहीर केल्यास मतदारांच्या मानसिकतेवर आणि मतदानावरही परिणाम होईल, हा तार्किक मुद्दा निवडणूक आयोगाच्या लक्षात येऊ नये ही कमालच म्हणावी लागेल.

भारतीय निवडणूक आयोगाचा इतिहास हा केवळ देशातील नव्हे, तर अवघ्या जगातील लोकशाहीसाठी प्रेरक असा आहे. जगातील सर्वांत मोठी आणि यशस्वी निवडणूक प्रक्रिया राबविणाऱ्या या प्रणालीची अवघ्या जगात ख्याती आहे. हिमालयाच्या दुर्गम शिखरांपासून ते कच्छच्या वाळवंटी भागापर्यंत, बांगलादेश-चीनच्या सीमावर्ती भागातील गावापासून अरबी समुद्राला लागून असलेल्या इवल्याशा वस्तीपर्यंत प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क मिळवून देण्याची आयोगाची क्षमता जगासाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. १९९० च्या दशकात टी. एन. शेषन यांच्यासारख्या आयुक्तांनी आयोगाच्या कार्याला कठोर शिस्तीचे आणि पारदर्शकतेचे नवे आयाम दिले होते. अशी गौरवशाली परंपरा असणाऱ्या आणि 'निवडणुका कशा घ्यावात' याचा वस्तुपाठ जगापुढे ठेवणाऱ्या भारतीय निवडणूक आयोगाच्या राज्यस्तरीय यंत्रणेने निवडणुका 'कशा घेऊ नयेत' याचे उदाहरणच आपल्या भोंगळ कार्यपद्धतीद्वारे जगापुढे ठेवले. या निवडणुकांची प्रक्रिया हाताळताना आयोगाने ज्या चुका केल्या, त्यामुळे राज्य आयोगाची अब्रूच मातीत गेली आहे. केंद्रीय पातळीवर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये कसलीही गंभीर त्रुटी न ठेवणाऱ्या आयोगाला, राज्याच्या पातळीवरील यंत्रणेच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकविषयक कायद्याचे आणि नियमांचे पालन करता आले नाही का, असा कठोर प्रश्न विचारण्याची वेळ यावी हे चांगले संकेत नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात न्यायालयानेच आयोगाचे कान टोचले हे योग्य झाले. निवडणूक आयोगाचे स्थानिक पातळीवरील नियंत्रण पूर्णपणे ढिसाळ असल्याचे नगर परिषदा व नगर पंचायतींच्या निवडणूक संचालनात दिसून आले. मतदारयाद्यांपासून अनेक गोष्टींच्या तक्रारी आहेत. स्थगित झालेल्या निवडणुका, निकालांना होणारा उशीर आणि न्यायालयीन खटले या साऱ्यांत प्रशासनाचा अमूल्य वेळ आणि सार्वजनिक पैसा वाया जात आहे. आधीच अनेक वर्षे खोळंबलेली विकासाची कामे आणखी लांबणार आहेत. निवडणूक आयोगासारख्या तटस्थ संस्थेच्या कार्यक्षमतेवर असे प्रश्नचिन्ह उभे राहिल्यास नागरिकांच्या मनात लोकशाही प्रक्रियेबद्दल अविश्वासाची बीजे रुजू शकतात. तसा प्रयत्न विरोधी पक्ष आधीपासून करीत आहेतच. त्यामुळे जनमानसात संभ्रम निर्माण झालेला आहेच. निवडणूक आयोग ही अशी यंत्रणा आहे, जी राजकीय पक्षांच्या हेतूंचा विचार न करता फक्त कायद्याच्या कक्षेखाली काम करते. या यंत्रणेचा प्रत्येक निर्णय आणि कृती नि:पक्षपातीपणा आणि कठोर कायदेशीर पालनाचा वस्तुपाठ असायला हवा. मात्र, या निवडणुकांच्या संचालनात ढिलाई दाखविली आणि स्वत:चेच हसे करून घेतले. त्यावर मुख्यमंत्र्यांसह सारेच नाराज होणे स्वाभाविकच होते. प्रत्येक गोष्ट न्यायालयाला सांगावी लागत असेल तर इतक्या जबाबदार यंत्रणा काय करतात, हा प्रश्न उपस्थित होतो. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला निकालाची तारीख सांगावी लागते आणि नियमावली तयार करण्याचा निर्देश छ. संभाजी नगरच्या खंडपीठाला द्यावा लागतो, हे आयोगाची प्रकृती ठीक नसल्याचे द्योतक आहे. न्यायालयांचा हस्तक्षेप किंवा त्यांच्या निर्देशांचे पालन हा तात्पुरता इलाज आहे. या गोंधळाचे इंगित निवडणूक आयोगाच्या रचनात्मक त्रुटींमध्ये आणि पुरेशा अभ्यासाविना निर्णय घेण्याच्या सवयीत दडलेले आहे. ज्या भारतीय निवडणूक आयोगाकडे जग मोठ्या आदराने बघते, ज्या आयोगाने देशामध्ये अनेक आव्हानात्मक निवडणुका शांततेत पार पाडल्या, त्याच आयोगाच्या राज्यस्तरीय यंत्रणेवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या संचालनाबाबत प्रश्न उपस्थित राहतात, हा साऱ्यांसाठी चिंतेचा विषय आहे. विरोधी पक्षांच्या हाती आणखी एक कोलीत देण्याचाच हा प्रकार आहे. राज्य निवडणूक आयोगाला यापुढेही निवडणुका घ्यायच्या आहेत. त्यावेळी देखील नियमांच्या पालनाची, आरक्षणाच्या नेमकेपणाची आव्हाने असतील. भविष्यातील कोणत्याही निवडणुकांमध्ये कुठलाही पेचप्रसंग निर्माण होऊ नये याकरिता राज्य निवडणूक आयोगाने आताच सुस्पष्ट नियमावली तयार करावी. केंद्रीय निवडणूक आयोगाने सक्तीने तयार करून घ्यावी. त्यासाठी राज्य आयोगाने वेळ मागितलेला आहे. आता राज्य निवडणूक आयोगाने गमावलेली प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करण्यासाठी या वेळेचा सदुपयोग करावा, हीच लोकशाहीप्रेमी नागरिकांची अपेक्षा आहे. साऱ्याच गोष्टी न्यायालयांत जात राहिल्या तर इतर यंत्रणांच्या अस्तित्वाला काहीही अर्थ राहणार नाही. शासनातील प्रत्येक यंत्रणेची कार्यकक्षा आणि जबाबदारी ठरलेली आहे. जबाबदारीनुसार सर्व यंत्रणांनी योग्य काम केले तर न्यायालयांना हस्तक्षेप करावा लागणार नाही. निवडणूक आयोग काही नव्याने स्थापन झालेला नाही. कित्येक दशके तो अस्तित्वात आहे. निवडणूक आयोग ही लोकशाहीच्या मूल्य व्यवस्थेचे तसेच प्रक्रियेचे प्राणपणाने रक्षण करणारी, निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शी पद्धतीने पार पाडणारी, सचोटीने निकाल लावणारी आणि त्यामुळेच कोट्यवधी भारतीयांसाठी आदराचा विषय असलेली यंत्रणा आहे. जगाच्या इतर देशांमध्येही भारतीय निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविषयी आदर आहे. आपल्या निवडणूक आयोगाचे लोक इतर देशांमध्ये निवडणूक कशी घ्यावी, याचे प्रशिक्षण देत असतात. राज्य निवडणूक आयोगात मात्र अकार्यक्षमता तेवढी दिसते. ती नागरिकांसाठी वेदनादायी आहे आणि लोकशाहीच्या दृष्टीनेही नुकसानदायी आहे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# एआय डेटा सेंटर्सचे विस्तारते विश्व

एकविसाव्या शतकात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' ही मानवजातीच्या विकासाची एक नवी दिशा ठरली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. या तंत्रज्ञानाचा पाया म्हणजे डिजिटल डेटा आणि तो साठवण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेली प्रचंड संगणकीय यंत्रणा डेटा सेंटर्स म्हणून ओळखली जाते. विशेषतः एआय डेटा सेंटर्स ही आधुनिक जगाची मेंदू-प्रणाली मानली जाते. ही केंद्रे केवळ माहिती साठवत नाहीत, तर ती विश्लेषित करून भविष्याचे निर्णय घेण्यास मदत करतात. एआय डेटा सेंटर्स म्हणजे अशी अत्याधुनिक केंद्रे, जिथे हजारो शक्तिशाली सर्व्हर्स, सुपरकॉम्प्युटर्स, नेटवर्क डिव्हाइसेस आणि स्टोरेज सिस्टिम्स एकत्र काम करतात. प्रचंड प्रमाणातील डेटा साठवण, मशीन लर्निंग मॉडेल्सचे प्रशिक्षण, डीप लर्निंग प्रक्रिया, क्लाऊड कम्प्युटिंग सेवा, रिअल-टाईम डेटा प्रोसेसिंग ही अशा डाटा सेंटर्सची ठळक वैशिष्ट्ये मानता येतात. हाय-परफॉर्मन्स संगणकप्रणाली, २४७ अखंड कार्यप्रणालीने सज्ज अशी ही डेटा सेंटर्स कधीही बंद होत नाहीत. दिवस-रात्र सतत सुरू राहतात. उच्च दर्जाची सुरक्षा प्रणाली, सायबर सिक्युरिटी, बायोमेट्रिक लॉक, फायरवॉल्सचा वापर. प्रगत कूलिंग सिस्टिम्स, सर्व्हर्स गरम होऊ नयेत म्हणून विशेष एअर कंडिशनिंग आणि लिक्विड कूलिंग, ऑटोमेशन आणि रोबोटिक देखभाल, अनेक ठिकाणी रोबोटिक सिस्टिम्स वापरून देखभाल ही या यंत्रणेची आणखी काही वैशिष्ट्ये.

एआय डेटा सेंटर्स जितके फायदेशीर आहेत, तितकेच पर्यावरणावर त्यांचे गंभीर परिणामही आहेत. प्रचंड वीज वापर ही त्यांची एक महत्त्वाची मर्यादा ठरते. डेटा सेंटर्स खूप मोठ्या प्रमाणात वीज वापरतात. ही वीज प्रामुख्याने कोळशावर आधारित असते, त्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन वाढते. ग्लोबल वॉर्मिंगला चालना मिळते. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे कूलिंग सिस्टिमसाठी प्रचंड प्रमाणात पाणी लागते. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होते. या सेंटर्सचा दुष्काळग्रस्त भागांवर गंभीर परिणाम होतो. डेटा सेंटर्स मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण करतात, आजूबाजूच्या वातावरणाचे तापमान वाढवते. जुने सर्व्हर्स, केबल्स, इलेक्ट्रॉनिक उपकरणे यामुळे विषारी घटक जमिनीत मिसळतात. भारतामध्ये डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया या योजनांमुळे डेटा सेंटर्सची संख्या वाढत आहे. मुंबई, पुणे, हैदराबाद, बंगळुरू, चेन्नई येथे मोठी डेटा सेंटर्स उभी राहत आहेत.



भविष्यात ग्रीन डेटा सेंटर्सचा वापर वाढेल. सौर, पवन ऊर्जेचा वापर होईल. पर्यावरणपूरक धोरणे लागू होतील. एआय डेटा सेंटर्समुळे होणारे धोके कमी करण्यासाठी काही उपाय आवश्यक आहेत. सौर, पवन, जलविद्युत नवीकरणीय ऊर्जेचा वापर ग्रीन कूलिंग टेक्नॉलॉजी पाणी बचत करणारी प्रणाली याबाबत यापुढे आग्रही राहावे लागणार आहे. ई-वेस्ट रिसायकलिंग, कार्बन फूटप्रिंट कमी करणे, स्थानिक लोकांना कौशल्य प्रशिक्षण हे ही काही दखलपात्र मुद्दे आहेत. भविष्यात एआय डेटा सेंटर्स ही केवळ सर्व्हर ठेवण्याची ठिकाणे न राहता 'डिजिटल फॅक्टरीज' आणि 'इंटेलिजंट ब्रेन्स' म्हणून काम करतील. येत्या दहा ते वीस वर्षांमध्ये खालील महत्त्वाचे बदल दिसतील. ग्रीन डेटा सेंटर्सचा उदय होणार आहे. भविष्यात बहुतेक डेटा सेंटर्स सौर, पवन व जलविद्युत ऊर्जेवर चालतील. 'कार्बन-न्यूट्रल' आणि 'नेट-झीरो' डेटा सेंटर्स ही संकल्पना प्रत्यक्षात येईल. भारतासारखा सूर्यप्रकाश विपुल असलेला देश या क्षेत्रात आघाडी घेऊ शकतो. मोठ्या, केंद्रीकृत डेटा सेंटर्ससोबतच लहान, स्थानिक 'मायक्रो डेटा सेंटर्स' वाढतील. त्यामुळे डेटा प्रोसेसिंग वापरकर्त्याजवळ होईल, वेग वाढेल आणि इंटरनेटवरील भार कमी होईल. येथे क्वांटम आणि न्यूरोमॉर्फिक कॉम्प्युटिंगची महत्त्वाची भूमिक असू शकते. भविष्यात क्वांटम कॉम्प्युटर्स आणि मानव मेंदूसारखे काम करणाऱ्या 'न्यूरोमॉर्फिक चिप्स' वापरात येतील. यामुळे कॉम्प्युटिंगची गती आणि क्षमतांमध्ये अभूतपूर्व वाढ होईल. याच सुमारास ऑटोमेटेड, सेल्फ-हिलिंग डेटा सेंटर्सही आकाराला येतील. उपलब्ध यंत्रणा स्वत:च आपल्या डेटा सेंटर्सचे मॉनिटरिंग, देखभाल आणि दुरुस्ती करतील. त्यामुळे 'सेल्फ रिपेअरिंग' सिस्टिम्स सामान्य होतील. यथावकाश केवळ शहरांमध्येच नव्हे तर ग्रामीण आणि अर्ध-ग्रामीण भागातही डेटा सेंटर्स उभारली जातील. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था डिजिटल युगात सामील होईल. डेटा सेंटर्समुळे अनेक नवीन व्यवसाय संधी निर्माण होत आहेत. या संधी फक्त मोठ्या कंपन्यांसाठी नसून लघु आणि मध्यम उद्योजकांसाठीही खुल्या आहेत.

डेटा सेंटर्सच्या वाढीने अनेक प्रकारचा रोजगारही निर्माण करून दिला आहे. यामुळे काही प्रकारचे स्टार्ट अप्स उभे राहू शकतात. यातून एआयची सेवा प्रदान करणारे प्लॅटफॉर्म सुरू करता येऊ शकतात. डेटा ॲनॅलिटिक्स कंपन्या सुरू करून क्लाऊड-आधारित सॉफ्टवेअर सेवा देता येऊ शकतात. उद्योगानुरूप सोल्यूशन्स (उदा. आरोग्य, शेती, फायनान्स) देता येतील. डेटा सेंटर्ससाठी सहायक व्यवसायही उभे राहू शकतात. डेटा सेंटर्सच्या भोवती 'इको-सिस्टिम' तयार होते. उदा. कूलिंग सिस्टिम मॅन्युफॅक्चरिंग, पॉवर बॅकअप सोल्यूशन्स (यूपीएस, जनरेटर), फायर सेफ्टी आणि सिक्युरिटी सिस्टिम्स, केबलिंग आणि नेटवर्किंग सेवा. हे व्यवसाय (लघु-मध्यम उद्योगांसाठी) खूप महत्त्वाचे ठरत आहेत. याखेरीज ग्रीन टेक आणि सस्टेनेबिलिटी स्टार्ट अप्स तसेच पर्यावरणीय समस्यांवर उपाय देणाऱ्या कंपन्यांसाठी मोठी संधी आहे. भारतासाठी डेटा सेंटर्स हे केवळ तंत्रज्ञानाचे क्षेत्र नसून राष्ट्रीय विकासाचे सामरिक साधन बनत आहेत. सरकारने डिजिटल इंडिया अभियान, मेक इन इंडिया, डेटा लोकलायझेशन पॉलिसी, नॅशनल स्ट्रॅटेजी अशा अनेक महत्त्वाच्या योजना सुरू केल्या आहेत. यामुळे भारतात डेटा सेंटर्समधील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. 'एआय २०३० इंडिया' उपक्रम ही सरकार-समर्थित योजना आहे. भारताला २०३० पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये जागतिक नेता म्हणून स्थान देण्याचा तिचा उद्देश आहे. नैतिक अंमलबजावणी आणि सामाजिक प्रभावावर जोरदार भर देऊन भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक आणि जबाबदार एआय अवलंब करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे एकविसाव्या शतकातील सर्वांत प्रभावी तंत्रज्ञान आहे आणि भारताने त्याचा उपयोग करून सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्याचा निर्धार केला आहे. 'एआय फॉर इंडिया २०३०' हे धोरण भारताच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताकडे काही नैसर्गिक फायदे आहेत. विपुल सूर्यप्रकाश सौर ऊर्जेसाठी भरपूर प्रशिक्षित मनुष्यबळ, तुलनेने कमी कामगार खर्च, मोठा डिजिटल युजर बेस यांचा या दृष्टिकोनातून फायदा घेता येईल. असे असले तरी भारतासमोरील डाटा सेंटर संस्कृतीच्या विस्तारापुढे काही मोठी आव्हाने आहेत. वीज पुरवठ्यातील अस्थिरता (ग्रामीण भागात), पाणीटंचाई, सायबर सिक्युरिटी धोके, कुशल मनुष्यबळ आणि सामान्य लोकांमध्ये आढळणारी डिजिटल दरी या आव्हानांचा या दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# सेवातीर्थ

देशाच्या लोकशाही प्रवासात काही क्षण असे येतात, जे केवळ प्रशासकीय निर्णय म्हणून नोंदविले जात नाहीत, तर येणाऱ्या काळाच्या दिशादर्शक म्हणून इतिहासात कोरले जातात. पंतप्रधान कार्यालयाचे नाव 'सेवातीर्थ' असे ठेवण्याचा निर्णय हा तसाच अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी क्षण आहे. 'सरकार' म्हटलं की अनेकांच्या मनात आजही दुरावा, कठोरपणा आणि आदेशांची प्रतिमा उभी राहते. पण लोकशाहीत शासन हे लोकांपासून वेगळे नसते. शासन म्हणजेच लोकसेवा, लोकांची इच्छा, लोकांचा विश्वास. 'सेवातीर्थ' हे नाव या नात्याला नव्या पवित्रतेची, नव्या ऊर्जेची दिशा देत आहे. तीर्थ म्हणजे काय? तीर्थ हा फक्त धार्मिक शब्द नाही. तीर्थ म्हणजे मनाला शांत करणारी जागा, तीर्थ म्हणजे पारदर्शकता, तीर्थ म्हणजे विश्वासाची शुद्धता. जेव्हा देशातील सर्वांत महत्त्वाची कार्यालये, जिथे राष्ट्राचे मोठमोठे निर्णय घेतले जातात, त्या ठिकाणाला 'सेवातीर्थ' म्हणतात. तेव्हा हा बदल फक्त शब्दांच्या पातळीवर राहत नाही. या शब्दात शासनाची संपूर्ण विचारसरणी गुंफलेली आहे. आम्ही सत्तेसाठी नाही, सेवेच्या पवित्र भावनेसाठी आहोत.

राजभवन ते लोकभवन हा शब्दाचा प्रवास दुराव्याऐवजी आपुलकी निर्माण करते. 'राजभवन' या नावात एक राजेशाहीपणा, एक अंतर, एक बंद दरवाजा जाणवतो. पण 'लोकभवन' म्हटले की प्रथमच मनात जवळीक निर्माण करते. हे भवन राजाचे नाही, लोकांचे आहे, लोकांसाठी आहे. हे त्या भवनाच्या नावावरूनच स्पष्ट होते. नावे बदलणे ही केवळ बाह्य गोष्ट नाही. नाव म्हणजे ओळख आणि ओळख म्हणजे विचार. जेव्हा सरकारी इमारतींची नावे 'लोकनिवास', 'कर्तव्य भवन', 'लोक कल्याण मार्ग' अशी ठेवली जातात, तेव्हा त्या शब्दांनीच प्रशासनाचे उद्दिष्ट स्पष्ट होते. या बदलातून सरकार हे सांगू पाहते की, शक्ती हे लक्ष्य नाही; सेवा हीच खरी शक्ती आहे. नागरिक अनुभवतात ती भावना बदलण्याची गरज आज निर्माण झाली आहे. आजही अनेक साधे नागरिक सरकारी कार्यालयात जाताना मनात एक दडपण, भीती, चिंता घेऊन जातात. तिथे पोहोचताच जडपणा जाणवतो. काऊंटर, पायऱ्या, नियम, रांगा जणू सेवा नव्हे, तर परीक्षा सुरू आहे. पण जर कार्यालयाचे नावच 'सेवातीर्थ' असेल, 'कर्तव्य भवन' असेल, 'लोकभवन' असेल, तर मनात जाणवणारा भाव बदलतो. नागरिकाला जाणवते की, मी इथे मागणी करायला नाही, हक्काने सेवा मिळवायला आलो आहे. एखाद्या तीर्थस्थळी गेल्यावर जशी निर्मळता, शांतता, विश्वास आणि मन:शांती मिळते, तशीच अनुभूती सरकारी कार्यालयातही मिळावी, हा या संकल्पनेचा गाभा आहे. सेवाभाव हा शासनाचा आत्मा आहे, हे विसरून चालणार नाही. शासनाचे खरे सामर्थ्य आदेशात नसते, तर सामान्य माणसाच्या चेहऱ्यावर समाधान आणण्यात असते. सेवा, कर्तव्य, पारदर्शकता, उत्तरदायित्व ही मूल्ये आजच्या लोकशाहीची खरी गरज आहे. 'सेवातीर्थ' या नावातून जणू शासन स्वत:लाच स्मरण करून देत आहे की, निर्णय कितीही मोठे असले, तरी ते जनतेच्या कल्याणासाठीच आहेत. बदल फक्त इमारतींचा नसून मानसिकतेचा आहे.

सरकारने घेतलेला हा निर्णय प्रशासकीय नसून सांस्कृतिक आहे. समाजाच्या विचारांमध्ये, शासनाकडून अपेक्षांमध्ये आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीत 'सेवा' ही भावना केंद्रस्थानी यावी, हा मुख्य उद्देश आहे. एखाद्या राष्ट्राला सर्वांत मोठा आधार असतो तो विश्वासाचा. विश्वास हरवला की लोकशाही कोसळते आणि विश्वास निर्माण झाला की देश प्रगतीच्या शिखरावर जातो. 'सेवातीर्थ' हे नाव हा विश्वास पुन्हा दृढ करण्याचा प्रयत्न आहे. शासन आणि जनता यांच्यातील नातं 'दूरचे' नाही, 'आपले' आहे, हे या नावातून स्पष्ट होते. नावात बदल करून शासनाने लोकांमध्ये विश्वासाचे टाकलेले हे एक पाऊल आहे. शासनाच्या इमारती कितीही भव्य असोत, त्यांची भव्यता लोकांच्या मनात निर्माण होणाऱ्या विश्वासावरच टिकून असते. 'सेवातीर्थ' हा शब्द त्या विश्वासाचा दीपस्तंभ आहे. सेवातीर्थ हे नाव सांगते की, इथे सत्ता नाही, सेवा आहे. इथे बंद दरवाजे नाहीत, खुली मनं आहेत. इथे अधिकार नाही, कर्तव्य आहे. सरकारचे हे पाऊल म्हणजे केवळ नावात बदल करणे नसून सेवा हीच लोकशाहीची ओळख आहे, हे स्पष्टपणे सांगण्याचा प्रयत्न आहे, ही जाणीव नव्याने दृढ करणारा एक ऐतिहासिक क्षण आहे. आणि म्हणूनच जिथे सेवा तीर्थासारखी पवित्र वाटते, तिथेच खरा 'सेवातीर्थ' जन्म घेतो.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र


**श्यामकांत जहागीरदार**

# आता भाजपाचे मिशन पश्चिम बंगाल

बिहार विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळाल्यानंतर भाजपाचे लक्ष आता पश्चिम बंगालकडे लागले आहे. पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी, २०२६ मध्ये विधानसभा निवडणूक होत आहे. २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भरधाव निघालेल्या विजयरथाला यावेळी कोणत्याही स्थितीत पश्चिम बंगाल काबीज करायचे आहे.

देशात जी काही मोजकी राज्ये आहेत, ज्यात भाजपाला आतापर्यंत कधीच विजय मिळाला नाही, त्यात पश्चिम बंगाल हे एक आहे. त्यामुळे यावेळी त्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत भाजपा करो वा मरोच्या जिद्दीने उतरणार आहे. त्याचे संकेत मोदी यांनी बिहार विधानसभा निवडणुकीतील निकालानंतर दिले. गंगा नदी ज्याप्रमाणे बिहारमधून निघून पश्चिम बंगालमध्ये प्रवेश करते, त्याचप्रमाणे भाजपाची विजय यात्रा आता पश्चिम बंगालमध्ये प्रवेश करत त्यात दीदीला (ममता बॅनर्जी) वाहून घेऊन जाईल, असे म्हटले आहे. मोदी यांच्या या प्रतिक्रियेतून पश्चिम बंगाल भाजपासाठी किती महत्त्वाचे आहे, याची कल्पना येते. बिहारमधील गंगा नदी यशस्वीपणे पार केल्यानंतर भाजपा आता पश्चिम बंगालमधील हुबळी नदी आपल्या ताब्यात घेण्याच्या प्रयत्नात आहे, असे म्हणावे लागेल. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात बुधवारी मोदी यांनी संसदभवनात पश्चिम बंगालमधील भाजपाच्या खासदारांची भेट घेत त्यांना विजयाचा कानमंत्र दिला. देशात पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू ही दोनच राज्ये अशी आहेत, ज्यात भाजपाला आतापर्यंत एकदाही विजय मिळवता आला नाही. तामिळनाडूच्या तुलनेत गेल्या काही वर्षांत पश्चिम बंगालमधील भाजपाच्या स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदा भाजपाला उल्लेखनीय यश मिळाले. त्यामुळे २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या आशा उंचावल्या. मात्र त्यावेळी भाजपाला सत्तेपर्यंत पोहोचता आले नाही. मात्र २०१६ च्या तुलनेत भाजपाच्या मतांत आणि जागांत लक्षणीय वाढ झाली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील ४२ पैकी तृणमूल कॉंग्रेसने २२ तर भाजपाने १८ जागा जिंकल्या. कॉंग्रेसला फक्त २ जागांवर समाधान मानावे लागले. तृणमूल कॉंग्रेस आणि भाजपा यांच्या मतांत फक्त ३ टक्क्यांचा फरक होता. तृणमूल कॉंग्रेसला ४३.२७ टक्के मते मिळाली तर भाजपाला ४०.२५ टक्के. तृणमूल कॉंग्रेसला २ कोटी ४७ लाख ५६ हजार ९८५ मते मिळाली, तर भाजपाला २ कोटी ३० लाख २८ हजार ३४३ मते मिळाली. याचाच अर्थ भाजपाने राज्यातील आपल्या जनाधारात चांगलीच वाढ केली.



२०१४ च्या लोकसभा निवडणुकीशी तुलना केली तर तृणमूल कॉंग्रेसच्या या निवडणुकीत १२ जागा कमी झाल्या, तर भाजपाच्या १६ जागा वाढल्या. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल कॉंग्रेसने ३४ तर भाजपाने २ जागा जिंकल्या होत्या. कॉंग्रेसला या निवडणुकीत ४ जागा मिळाल्या होत्या.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल कॉंग्रेसला २९ तर भाजपाला १२ जागा मिळाल्या होत्या. २०१९ च्या तुलनेत तृणमूल कॉंग्रेसच्या ७ जागा वाढल्या, तर भाजपाच्या ६ जागा कमी झाल्या. तृणमूल कॉंग्रेसने भाजपाच्या तुलनेत १७ जागा जास्त जिंकल्या तरी तृणमूल आणि भाजपाच्या मतांत फार जास्त फरक नाही. तृणमूल कॉंग्रेसला २ कोटी ७६ लाख ७४ हजार १३३ मते मिळाली, तर भाजपाला २ कोटी ३४ लाख ३१ हजार ८१ मते पडली.

बिहारच्या विधानसभा निवडणुकीत मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाचा (एसआयआर) मुद्दा चांगलाच गाजला होता. या मुद्यावरून विरोधी पक्षांनी निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला होता. पण बिहारच्या सुजाण मतदारांनी एसआयआरच्या बाजूने आपला कौल देत हा प्रयत्न हाणून पाडला. आता पश्चिम बंगालमध्ये तृणमूल कॉंग्रेसच्या सर्वेसर्वा आणि राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या मुद्यावरून आकाशपाताळ एक करत आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकांचा आढावा घेतला तर पश्चिम बंगालमध्ये भाजपाची ताकद किती वेगाने वाढली, याचा आपल्याला अंदाज येऊ शकेल. २०११ च्या विधानसभा निवडणुकीत २८९ जागा लढवणाऱ्या भाजपाला एकही जागा जिंकता आली नाही, भाजपाला यावेळी ४.०६ टक्के मते मिळाली होती. या निवडणुकीतून ममता बॅनर्जी यांनी राज्यातील डाव्या पक्षाची राजवट उलथून लावत पहिल्यांदा तृणमूल कॉंग्रेसची सत्ता आणली होती.

२०१६ च्या विधानसभा निवडणुकीत ३ जागा जिंकत राज्यात प्रथमच भाजपाने आपले खाते उघडले. यावेळी भाजपाच्या मतांची टक्केवारी १०.१६ होती. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीतून तर भाजपाने राज्यात इतिहास घडवला. या निवडणुकीत सलग तिसऱ्यांदा आपल्याकडे सत्ता कायम ठेवण्यात तृणमूल कॉंग्रेसने यश मिळवले असले तरी भाजपाला मिळालेला विजय नेत्रदीपक म्हटला पाहिजे. राज्यातील विधानसभेच्या सर्व म्हणजे २९३ जागा लढवत भाजपाने ७७ जागा जिंकल्या. भाजपाने ७४ जागा जास्त जिंकल्या, हा एक विक्रम म्हटला पाहिजे. भाजपाच्या मतांची टक्केवारी ३७.९७ होती. भाजपाला २ कोटी २८ लाख ५० हजार ७१० मते मिळाली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या विजयाचा हा परिणाम होता. या लोकसभा निवडणुकीत भाजपाने १८ जागा जिंकत २ कोटी ३० लाख २८ हजार ३४३ मते मिळवली होती. लोकसभा निवडणुकीत मिळालेली मते विधानसभा निवडणुकीत कायम ठेवण्यात भाजपाला यश आले. भाजपाने कधीपासूनच पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांना भाजपाने निवडणूक प्रभारी तर त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लबकुमार देव यांना सहप्रभारी बनवले आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपासमोर खरे आव्हान सलग तीन विधानसभा निवडणूक जिंकणाऱ्या राज्याच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल कॉंग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांचे आहे. ममता बॅनर्जी अतिशय आक्रमक नेत्या आहेत. त्यांचे संपूर्ण राजकारण हे मुस्लिम तुष्टीकरणाचे आहे. त्यामुळे एसआयआरच्या मुद्यावरून त्या आकाशपाताळ एक करत आहेत. देशातील राजकारणात सर्वांत धूर्त आणि आक्रमक नेत्या अशी ममता बॅनर्जी यांची ओळख आहे. शरद पवार देशातील सर्वांत धूर्त, चाणाक्ष आणि मुत्सद्दी नेते म्हणून ओळखले जातात. पण सात शरद पवार बरोबर एक ममता बॅनर्जी अशी प्रतिक्रिया एका ज्येष्ठ भाजपा नेत्याने व्यक्त केली आहे. त्यामुळे यावेळची निवडणूक भाजपासाठी अतिशय आव्हानात्मक आहे. मात्र अशा अनेक आव्हानांचा सामना करणे हा नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या डाव्या हाताचा खेळ आहे, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## लोकसभा चर्चेसाठी, भांडण्यासाठी नव्हे

आजकाल पहिल्याच दिवसापासून कामकाज करण्यापेक्षा, सभागृहात फलक घेऊन निरर्थक घोषणाबाजी करण्यातच देशातील विरोधी पक्ष धन्यता मानतात. हे त्यांच्याकडे कुठलेच रचनात्मक किंवा योग्य मुद्दे नसल्याचे द्योतक आहे. केवळ जनमानसात आपली स्मृती राहावी म्हणून ते असे लक्षवेधक मुद्दे घेत असावेत. सध्याचे सर्वच विरोधी पक्ष हताश झाले असावेत, असे वाटायला बराच वाव आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे चुकीचे व अतार्किक विषय घेऊन सरकारशी भांडण्यात प्रसिद्ध आहेत, पण त्याचबरोबर तेजस्वी यादव, अखिलेश यादवसारखे युवा नेता, जे नैराशाने ग्रासलेले वाटतात व ते सुद्धा त्यांना साथ देतात व जनतेत आपले हसू करून घेतात. देशाचे काहीही होवो, पण मोदींना सर्वच मुद्यांवर विरोध करावा, हे त्यांचे धोरण म्हणजे, 'नवरा मेला तरी चालेल, पण सवत विधवा झालीच पाहिजे', असे मूर्खपणाचे वाटते. देशाचे महत्त्वाचे मुद्दे, प्रश्न व प्रगतीविषयी सांगोपांग चर्चा करण्यासाठी लोकसभा आहे. तेथील कामकाजावर जनतेचा खूप पैसा खर्च होतो. लोकसभेच्या आत होणाऱ्या गोंधळावर देशाचे अतोनात नुकसान होते, हे विरोधी पक्षांना कळत नसावे काय? भारतात घराणेशाहीपेक्षा रचनात्मक विचार असणारे विरोधी पक्ष वाढावे व देशाच्या विकासात त्यांचा सहभाग असावा, ही इच्छा.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### लग्नात खर्च नव्हे, संस्कार दिसायला हवेत!

सध्या लग्न म्हटले की दागदागिने, महागडे कपडे, उंची भेटवस्तू, विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, महागडे डेकोरेशन, सेलिब्रिटी मेकअप, डीजे आणि त्यासमवेत मद्याच्या मेजवान्या या सर्व गोष्टी ओघाने येतात. अनेक ठिकाणी तर 'वेडिंग प्लॅनर' आणि 'डेस्टिनेशन वेडिंग' हीसुद्धा नवी फॅशन झाली आहे. आज महागाई वाढत असूनही राज्यासह देशाच्या अनेक भागांत विवाह हा केवळ धार्मिक विधी राहिला नसून श्रीमंती, प्रतिष्ठा आणि प्रदर्शनाचा कार्यक्रम बनला आहे. एका दिवसातील विवाह सोहळ्यात काही लाखांपासून ते काही कोटी रुपयांपर्यंत खर्च होताना दिसतो. शोध सांगतात की देशातील सुमारे ३० टक्के तरुण लग्नासाठी कर्ज घेतात आणि ते फेडण्यासाठी अनेक वर्षे झगडतात. काही जण केवळ रूढी किंवा समाज काय म्हणेल या भीतीने खर्च करतात, तर काही जण 'स्टेटस' टिकवण्यासाठी मागे कर्जाचे डोंगर उभे करतात. ही उधळपट्टी केवळ आर्थिक भार वाढवत नाही, तर सामाजिक असमानता, दिखावा आणि मानसिक ताणही वाढवते. या पृष्ठभूमीवर उत्तराखंडमधील जौनसर-बावर या प्रदेशातील लोकांनी एक अतिशय अनुकरणीय निर्णय घेतला आहे आणि आज तो संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे. या भागातील परंपरा, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्य आजही टिकून आहे. तेथे अनेक ठिकाणी पांडवकालीन न्यायव्यवस्थेचे पालन होते असे मानले जाते. येथील २५ गावांनी मिळून एकत्रितपणे असा नियम केला आहे की लग्नात महागडी सजावट, दारू, फास्ट फूड आणि अतिखर्ची वस्तूंवर संपूर्ण बंदी, नियम मोडणाऱ्यांना १ लाख रुपयांचा दंड, महिलांनी लग्नात केवळ तीन पारंपरिक दागिनेच वापरायचे. जरी या गावांची आर्थिक क्षमता चांगली आहे, तरीही त्यांनी ठरवले की 'लग्नात खर्च नव्हे, संस्कार दिसायला हवेत.' विवाह सोहळा संस्कार म्हणून केला तर पुढे दोघांचेही आयुष्य सुरळीत सुख-समृद्धीचे होऊ शकते. लग्नात डेकोरेशन, मेकअप, नाच-गाणे यामुळे मुहूर्तावर लग्न लागत नाही. विवाह हा जीवनातील अत्यंत पवित्र संस्कार आहे. तो क्षणिक दिखावा, प्रतिष्ठेची स्पर्धा किंवा आर्थिक ओझे बनू नये. समाजात सुरू झालेली साधेपणाची ही चळवळ केवळ आर्थिकच नव्हे, तर नैतिक आणि सांस्कृतिक जागृतीचे प्रतीक आहे. जर देशभरात अशा विचारांची रुजवण झाली, तर विवाहसोहळे पुन्हा संस्कार, कुटुंब प्रेम आणि अध्यात्माने भरलेले होतील. दिखावा, कर्ज आणि ताणाने नव्हे.

**रमा देशमुख**/नागपूर

## आजचे संघगीत-६२

गुरुवार, ४ डिसेंबर २०२५

### एक अंतरी आस आमुच्या मुखांत एकच गान

एक अंतरी आस आमुच्या मुखांत एकच गान

एक अंतरी आस आमुच्या मुखांत एकच गान
देशासाठी उधळू हासत फुलापरी हे प्राण ॥धृ.॥

एक आमुची आई भारत अम्ही लेकरे सारी
भरत देश हा देव आमुचा आम्ही सर्व पुजारी
आम्ही सगळे एक इथे नच कुणिहि थोर वा सान ॥१॥

भरतखंड हा सागर आम्ही बिंदु जलाचे त्यांत
किरणे आम्ही भारत अमुचा सूर्य नभात
आम्ही सगळे एक आमुचा एक असे अभिमान ॥२॥

असंख्य पाने अगणित शाखा वृक्ष तरीही एक
हजार जाती पंथ लक्ष तरि पिंड आमुचा एक
आम्ही सगळे एक कुणी नच रंक राव धनवान ॥३॥

मनामनांतुनि देशभक्तिची ज्योत तेवते एक
देह भिन्न तरि नसांनसांतुनि रक्त खेळते एक
आम्ही सगळे एक आमुचे भगवे एक निशाण ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# संताच्या वाणीतून समाजाला ऊर्जा मिळते : आ. संजय बनसोडे

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ४ डिसेंबर :** उदगीर मतदारसंघ हा एक ऐतिहासिक असून या मतदारसंघात अनेक धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या संख्येने होत आहेत. राज्यातून विविध भागातून संत या ठिकाणी येऊन त्यांचे अनमोल विचार समाजातील नागरिकांपुढे व्यक्त करत असतात. या सर्व संतांच्या वाणीतून समाजाला नवी ऊर्जा मिळत असुन आपल्या पुढच्या पिढीवर चांगले संस्कार होत असल्याचे मत राज्याचे माजी क्रीडा मंत्री तथा उदगीरचे आ. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरातील श्री दत्त मंदिर येथे श्री दत्त जयंतीनिमित्त आयोजीत एकदिवसीय प्रवचन सोहळ्या प्रसंगी भाविकांना संबोधित करताना बोलत होते.

यावेळी गुंडानाथ महाराज, चक्रीनाथ महाराज, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, माजी नसरसेवक सुधीर भोसले, सोसायटीचे अध्यक्ष विजयकुमार पारसेवार, भागवत पारसेवार, सुरेश महाजन, बालाजी



पोलावार, संजय कलकोटे, साईप्रसाद पारसेवार, सुयोग कोटलवार, विनोद कपाळे, शिवकुमार कांबळे, धिरज कसबे, गणेश गायकवाड, शहाजी पाटील, सावन पस्तापुरे, प्रीती कवतीकवार, डी.एस. बिरादार, सतिश पाटील माणकीकर, आदीनाथ चिकटवार, मल्लिकार्जुन लंजवाडकर, केशव पाटील, सावित्री पारसेवार, गोदावरी महाजन, मनीषा मुक्कवार, स्मिता मुक्कावार, ओम पिंगळे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी आपल्या आमदारकीच्या व मंत्रिपदाच्या कार्यकाळात शक्य होईल तेवढ्या सर्व धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण आपण केले आहे. विविध ठिकाणी सभा मंडप उभारण्यात आले आहेत.

भविष्यात उदयगिरी बाबा किल्ला परिसरात विद्युत रोषणाई करण्याचा आपला मानस असुन मागील काळात श्री गुरु हावगीस्वामी महाराज मठाला निधी दिला. श्री सिध्दरामेश्र्वर मठासह श्री रेणुकाचार्य संस्कार भवन उभारले, श्री गुरु हावगीस्वामी लिंगायत भवन उभारले असुन चौकीला मठालाही निधी दिला असल्याचे सांगितले.

या येत्या वर्षाभरात या सोसायटीतील श्री दत्त मंदिर परिसरात सभामंडप उभारणार असल्याचे सांगून सर्वांना आ.बनसोडे यांनी श्री दत्त जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

यावेळी श्री दत्त जयंतीनिमित्त आ.संजय बनसोडे यांच्या हस्ते आरती करुन भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. यावेळी भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरसेवक भागवत फुले यांनी प्रभागातील सोडविल्या समस्या



**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, ४ डिसेंबर :** चाकूर नगरपंचायतीचे नगरसेवक भागवत फुले यांनी प्रभाग क्र.१६ मधील नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेत त्या तात्काळ सोडवून नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे.त्यामुळे नागरीकांतून समाधान व्यक्त केले आहे.

रोजगार हमी योजना,घरकुल योजना,सांडपाणी नाल्या तसेच वॉर्डातील पाणीपुरवठ्याशी संबंधित समस्या नागरिकांनी नगरसेवक भागवत फुले यांच्याकडे मांडल्या होत्या.या सर्व समस्यांवर तत्काळ कार्यवाही करीत संबंधित विभागांशी समन्वय साधून फुले यांनी उपाययोजना करून त्या सर्व समस्या सोडविल्या त्यामुळे नागरिकांतून फुले यांचे कौतूक करण्यात येत आहे.यावेळी नगरपंचायतमधील घरकुल विभागाचे बाळू भुरे उपस्थित होते.

नगरसेवक भागवत फुले यांनी सातत्याने केलेल्या कामाबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त करत त्यांच्या कार्याचे कौतूक केले.नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवणारे समाजाभिमुख नेतृत्व चाकूर नगरपंचायतला लाभले अशी भावना यावेळी नागरिकांनी व्यक्त केली असून तात्काळ समस्याचे निराकरण केल्यामुळे सर्व स्तरातून नगरसेवक भागवत फुले यांचे कौतूक होत आहे.

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस जन्मठेप; दोन लाखांचा दंड

**उदगीर विशेष जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल**

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ४ डिसेंबर :** तालुक्यातील शेल्हाळ येथे सन २००९ मध्ये आरोपीने गावठी कट्ट्याने गोळी झाडून फिर्यादीस जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी उदगीर विशेष जिल्हा सत्र न्यायाधीश डी. बी. म्हालटकर यांनी आरोपीस सश्रम जन्मठेपेची शिक्षा व दोन लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

या प्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिसात आरोपीविरूद्ध गु. र. नं. १५२/२००९ कलम ३०७ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक शेख यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

सदर खटल्याची सुनावणी पिठासीन अधिकारी सत्र बी. न्यायाधीश डी. बी. म्हालटकर यांच्या न्याय दालनात झाली. सुनावणी दरम्यान सरकार एकुण १६ साक्षीदारांची साक्ष नोंदविली. जखमी, वैद्यकीय अधिकारी, न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेचा अहवाल तसेच संचिकेतील कागदपत्रांच्या अनुषंगाने सहा. सरकारी वकील अ‍ॅड. एस. एम. गिरवलकर यांनी युक्तीवाद केला. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरून जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. म्हालटकर यांनी आरोपीस कलम ३०७ भा. दं. वी. प्रमाणे सश्रम जन्मठेपेची शिक्षा व २ लाख रुपये दंड, कलम १२० (ब) प्रमाणे १० वर्षे सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे. दंड रक्कमेपैकी १ लाख रुपये जखमीला देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच दंड न भरल्यास १ वर्षे सश्रम कारावास अशी शिक्षा आरोपीस दिली आहे. तर यातील दुसरा आरोपीची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आहे. सरकार पक्षाच्या वतीने सरकारी वकील म्हणून अ‍ॅड. एस. एम. गिरवलकर यांनी काम पाहिले व जखमीतर्फे अ‍ॅड. आर. पी. गंभीरे व कोर्ट पैरवीकार पोहेकॉ अक्रम शेख यांनी सहकार्य केले.

# कार्यकर्त्यांनी आत्मविश्वास कायम ठेवावा : अरविंद पाटील

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, ४ डिसेंबर :** निलंगा नगर पालिका निवडणुका पुढे ढकलल्या असल्या तरीही प्रचारादरम्यान मतदाराने भाजपच्या बाजूने कौल दिल्याने स्थानिक भाजपाच्या कार्यकर्त्यात उत्साह आहे. पुढील २० दिवसांचा काळ आपल्यासाठी अडथळा नसून, मतदारापर्यंत पोहोचण्याची व आपली ताकद वाढवण्याची संधी आहे. म्हणून बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी अधिक संघटित होऊन प्रचाराचा वेग, जोश, आत्मविश्र्वास कायम ठेवावी असे आवाहन भाजपचे युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांनी केले आहे.

निलंगा नगर पालिका निवडणुका २० दिवसांनी पुढे ढकलल्या असल्याच्या पार्श्वभूमीवर, स्थानिक राजकारणात नवी हलचल सुरू झाली आहे. विरोधकांनी विविध राजकीय अर्थ लावण्याचा प्रयत्न केला असतानाच, भाजपाचे युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांनी आपल्या समर्थकांना आणि सर्व बूथ प्रमुखांना ठाम संदेश देत त्यांचा आत्मविश्र्वास दुणावला आहे.

निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या-पण आपला वेग, जोश आणि आत्मविश्वास अजिबात कमी झालेला नाही. निलंग्याच्या जनतेनं दिलेला वाढता पाठिंबा काही लोकांना अस्वस्थ करत आहे. त्यांनी हा २० दिवसांचा कालावधी ही अडथळा नसून ताकद वाढवण्याची सुवर्णसंधी असल्याचं सांगत सर्व बूथप्रमुखांना



नव्या उमेदीने संपर्क मोहीम राबवण्याचे आवाहन केले.

प्रत्येक बूथ हा आपला किल्ला आहे आणि प्रत्येक कार्यकर्ता ही आपली खरी शक्ती, असं प्रतिपादन करत त्यांनी निलंग्याची जनता आज भाजपाच्या पाठीशी मजबुतीने उभी असल्याचा आत्मविश्वासही व्यक्त केला.

त्यांच्या संदेशात शिस्त, संयम, सकारात्मकता आणि सातत्य या चार मंत्रांवर विशेष भर देण्यात आला.

पुढील २० दिवसांत प्रत्येक घराशी, कुटुंबाशी आणि मतदाराशी पुन्हा प्रभावी संवाद साधण्याचे आवाहन त्यांनी केलं. महिला, तरुण आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांना एकत्र करून बूथ स्तरावर प्रचंड ताकद उभारण्याची आवश्यकता असल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट सांगितले.

अडथळ्यांवर भाष्य करताना त्यांनी म्हटलं अडथळे आले म्हणून आपण मागे हटत नाही. उलट अडथळ्यांना पार करून आपण योग्य दिशेने जात आहोत, याचीच खात्री आहे. निलंगा विधानसभा क्षेत्रात २० डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानात भाजपचा भव्य विजय निश्चित आहे, असा ठाम विश्वास व्यक्त करत त्यांनी कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा, नवा आत्मविश्वास आणि एकजुटीने कामाला लागण्याचं आवाहन केले.

त्यांचा हा संदेश बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण करणारा ठरला आहे. निवडणुका पुढे ढकलल्या गेल्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय अनिश्चिततेतून भाजपाला संघटनात्मकरित्या अधिक मजबूत बनवण्याची हीच संधी असल्याची भावना कार्यकर्त्यांत आहे.

# क्राईस्ट इंटरनॅशनल स्कूलचे बाह्यमूल्यांकन पूर्ण

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ४ डिसेंबर :** येथील तळेगाव परिसरातील



क्राईस्ट इंटरनॅशनल स्कूलमध्ये एसक्यूएएफचे बाह्य मूल्यांकन दि २६ नोव्हेंबर यशस्वीरीत्या पार पडले. या मूल्यांकनासाठी आलेल्या पथकात कासार एस. बी. (केंद्रप्रमुख व पथकप्रमुख), मुंडकर के. आर. (केंद्रीय मुख्याध्यापक, शिरूर), आणि माधव मठवाड (मुख्याध्यापक, मोरेवाडी) यांचा समावेश होता.

पथकाने शाळेतील शैक्षणिक प्रक्रिया, सुविधा, दस्तऐवज, विविध विभागांची मांडणी तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीची तपासणी केली. या भेटीदरम्यान मान्यवरांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच पथकातील सदस्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला व उन्नतीसाठी योग्य मार्गदर्शन केले.

या संपूर्ण मूल्यांकन प्रक्रियेत शाळेच्या प्राचार्या श्रीमती जेबाबेरला नादार, संगमेश्वर ढगे, सूर्यकांत गोरे, धनंजय राचमाले यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# शहरातील सर्व धार्मिक स्थळांचा विकास करणार : माजी मंत्री आ. संजय बनसोडे

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ४ डिसेंबर :** मतदार संघात असलेल्या सर्व धार्मिक स्थळांचा विकास करुन मतदार संघात सर्व भावकांना सर्व सुख सोई सुविधा उपलब्ध केल्याने भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. राहिलेल्या सर्व धार्मिक स्थळांचा विकास येत्या काळात शासनाच्या विविध योजना राबवुन करणार असल्याचे मत माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले आहे. ते उदगीर शहरातील श्री सद्गुरु शंकरलिंग महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजीत अखंड हरिनाम सप्ताहनिमित्त उपस्थित भाविकांना संबोधताना बोलत होते.

यावेळी सुखदेव स्वामी महाराज, उध्दव महाराज हैबतपुरे, ह.भ.प. देवराज महाराज, माजी नगराध्यक्ष बसवराज बागबंदे, माजी नगरसेवक मनोज पुदाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, प्रा.श्याम डावळे,भाजपा शहराध्यक्ष अमोल अनकल्ले, सर्जेराव भांगे, बाळासाहेब पाटोदे, शिवकुमार कांबळे, धिरज कसबे, कुणाल बागबंदे, चंद्रकांत गुडमेवार, जयशंकर स्वामी, श्रीनिवास रायचुरकर,अमोल घुमाडे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी श्री सद्गुरु शंकरलिंग महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त नतमस्तक होवून मतदार संघातील सर्व नागरीक सुखी व समाधानी आणि एकोप्याने रहावे अशी प्रार्थना केली. उदगीर ही ऐतिहासिक व संतांची भुमी आहे. मतदार संघात शेकडो मठ व मंदिर असुन जवळपास सर्वच ठिकाणच्या सभामंडपाला निधी दिला आहे. भविष्यात आपल्या भुईकोट किल्ल्याला विद्युत रोषणाई करणार असुन या ऐतिहासिक वास्तूला जपण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करुन घेवुन किल्ला जतन व दुरूस्तीचे काम चालु आहे. श्री सद्गुरु शंकरलिंग महाराज मठाच्या सुशोभिकरणासाठी ५० लक्ष रुपयाचा निधी मंजूर केला असून आणखी निधी वाढवून या परिसराचे सुशोभिकरण करणार असल्याचे सांगुन या परिसरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या भागात सुविधा उपलब्ध करुन देण्याची ग्वाही आ.संजय बनसोडे यांनी दिली. यावेळी उदगीर शहर व परिसरातील भाविक भक्त व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘उदयगिरी’च्या खेळाडूंची क्रीडा महोत्सव संघात निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ४ डिसेंबर :** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या ऋतुजा सूर्यवंशी (टेबल टेनिस) राठोड वैष्णवी (थलेटिक्स) शुभम शिंदे, रोहन कोरे (खो-खो) ह्या खेळाडूची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा महोत्सव संघात निवड झाली आहे.

सदर खेळाडू दिनांक ४ ते ८ डिसेंबर २०२५ या कालावधीत नांदेड विद्यापीठ येथे होणाऱ्या २७ वा महाराष्ट्र राज्य आंतर त









विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. या खेळाडूस क्रीडा संचालक प्रा.सतिश मुंढे, प्रा. रमजू शेख यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बस्वराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# ‘दयानंद’एआय प्रशिक्षणाचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ डिसेंबर :** येथील दयानंद शिक्षण संस्थाद्वारा संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात बीसीए तृतीय व एमसीए प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठो ' एआय विथ पायथॉन ' या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या अभिनव उपक्रमाचे आयोजन करिअर गाईडन्स अँड प्लेसमेंट सेलच्या पुढाकाराने करण्यात आले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून फ्युएल कंपनीचे शुभम सोनवणे यांची उपस्थिती होती. या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध संकल्पना, कौशल्य विकास सत्र, तसेच विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी मुलाखत तंत्र आयोजन केले गेले. या कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर बीसीए विभाग प्रमुख प्रा. डॉ. वैशाली सातपूते , प्रशिक्षण अधिकारी प्रा. दगडू शेख उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रसाद पाटील, प्रा. गीतांजली जोशी, प्रा. ज्योती महावरकर यांसह अनेकांनी परिश्रम घेतले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी सातत्याने अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याला उत्स्फूर्त असा प्रतिसादही, हलतो, हे विशेष.

# छ. शिवाजीराजे महाविद्यालयात क्रीडा ज्योतची मशाल रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ४ डिसेंबर :** येथील छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात क्रीडा महोत्सवाच्या मशाल रॅलीचे स्वागत करण्यात आले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या वतीने २७ वा महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या रॅलीचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामकिसन मांजरे यांनी केले. या मशाल रॅलीचे महाविद्यालयाच्या वतीने नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अतिश आकडे, क्रीडा संचालक डॉ. नेहाल अहमद खान यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.बालाजी सूर्यवंशी यांनी केले तर आभार डॉ. व्ही. के. भालेराव यांनी मानले.

# दिव्यांग दिनानिमित्त मुंडेंच्या हस्ते मोबाइल थेरपी बसचे उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ४ डिसेंबर :** द हंस फाउंडेशन आणि राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था, प्रादेशिक केंद्र नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानने सुरु असलेल्या दिव्यांगासाठीच्या नविन तिसऱ्या मोबाइल थेरपी बस जागतिक दिव्यांग दिनानिमित्त श्री तुकारामजी मुंडे,सचिव, दिव्यांग कल्याण विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या शुभ हस्ते उदघाटन करण्यात आले.

सदरिल बस ठाणे आणि परिसरातील विविध १५ ठिकाणी दिव्यांगाना त्यांच्या घराजवळ जाऊन पुनर्वसन विषयक मोफत सेवा दिल्या जातील, उदघाटन प्रसंगी या प्रसंगी श्री तुकारामजी मुंडे,सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यानी बसची सूक्ष्म पाहणी केली. उपलब्ध सेवा, थेरेपिस्ट यांच्याशी संवाद साधला आणि नावीन्य पूर्ण प्रकल्पाचे कौतुक केले.

यावेळी बोलताना म्हणाले की, दिव्यांग मुलांचे शीघ्र हस्क्षेपण, पुनर्वसन ही थेरपी बस आपले योगदान देईल आणि प्रकल्पद्वारे दिव्यांगजना बाबत प्रचलित कायदे, सेवा, सवलती, योजनाचा प्रचार करण्याचे सुचना दिल्या तसेच ग्रामीण भागातही अश्या प्रकल्पाची आवश्कता असल्या पाहिजेत व विविध सामाजिक संस्थानी यासाठी पुढाकार घेण्याचें आवाहन केले.

नेपीयाडचे प्रभारी अधिकारी डॉ.रवि प्रकाश सिंह, मंगेश पाटील, जिल्हा दिव्यांगजन सक्षमीकरण अधिकारी, अलिबाग, रायगड, विशेष अतिथी म्हणून डॉ. अविनाश पडालकर, रेडिओलॉजिस्ट, सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे, जगन मुदगडे, प्रोजेक्ट हेड, द हन्स फाउंडेशन उपस्थित होते.



# लोखंडी सावरगाव जवळ ट्रक आणि टेम्पोचा भीषण अपघात

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.४ डिसेंबर**

जालन्याहून हुमनाबादला सळई घेऊन जाणारा भरधाव वेगातील ट्रक रस्त्यावर पंक्चर झालेल्या खताच्या टेम्पोवर आदळून झालेल्या अपघातात टेम्पो चालक जागीच ठार झाला. अन्य दोन जण जखमी झाले. ज्योतीराम सदाशिव जाधव (वय ४३ रा. लक्ष्मी टाकळी ता. पंढरपूर जि. सोलापूर) असे मयत टेम्पो चालकाचे नाव आहे. हा अपघात बुधवारी सकाळी साडेआठ वाजता लोखंडी सावरगाव जवळील राज्य महामार्गावर घडला.





अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी सावरगाव जवळील बीड राज्य महामार्गावर बुधवारी सकाळी साडेआठ वाजता खताचा टेम्पो क्रं. एम.एच.-११. ए.एल. ६३७५ पंक्चर झाल्यान` रस्त्यावर उभा होता. याच वेळी जालन्याहून हुमनाबादला सळई घेऊन जाणारा ट्रक क्रमांक के.ए. ५६-६८५६ टेम्पोवर पाठीमागून आदळून झालेल्या अपघातात टेम्पोचालक ज्योतीराम सदाशिव जाधव हा टेम्पोखाली चिरडून जागीच ठार झाला. तर ट्रक चालक दयानंद हनुमंत आप्पा वय ५१ व पंक्चर काढण्यासाठी आलेले लोखंडी सावरगाव येथील फारूख युनूस शेख वय ३१ हे दोघेही सदरील अपघातात जखमी झाले असून त्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघाताच्या वेळी टेम्पो रस्त्याच्या कडेला आहे. अपघाताच्या वेळी टेम्पो रस्त्याच्या कडेला खड्यात जाऊन पलटी झाला. अपघाताची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मुरलीधर खोकले, सहपोलिस निरीक्षक डॉ. चंद्रकांत जगताप, बीट अंमलदार पी. एस. ऊळे, राहुल भोसले यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. टेम्पो चालकाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात पाठवण्यात आला.

## बीड ग्राहक पंचायत महाराष्ट्र कार्याचे माजी मंत्री बदामराव पंडित यांच्याकडून कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.४ डिसेंबर**

बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या ग्राहक मार्गदर्शन केंद्र यांच्या कडून ग्राहकाला विविध विषयावर मार्गदर्शन केले जाते. ग्राहकाच्या समस्या बाबत संबंधित कार्यालयास निवेदन दिले जाते ,चर्चा करणे, समस्या बाबत पाठपुरावा करणे, कामाची पूर्तता करून घेणे , ग्राहक हिताची कामे केली जातात. ग्राहक हिताची प्रश्न मांडले जातात.



उपजिल्हा कार्यालयातील एक्स-रे मशीन अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे दररोज नियमितपणे चालू राहत नसल्याचे गंभीर बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे रुग्णाला बीड येथे रेफर केले जाते. एक्स-रे ही मूलभूत सुविधा आहे. सदरील सुविधा पुरविण्यासाठी कर्मचाऱ्यांची मागणी करावी अशी मागणी बीड ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्याकडून करण्यात आली होती. ती बातमी वाचून माजी मंत्री बदामरावजी पंडित यांनी भ्रमणध्वनी द्वारे उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक यांना सर्व मशीन अद्यावत करण्याच्या सूचना करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर पुन्हा बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांच्या समक्ष पुन्हा संबंधितांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क केलेला आहे व आपले कार्य कौतुकास्पद असल्याचे मान्य केले.


तसेच श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था विरंगुळा केंद्र गेवराई येथील कार्यालयास भेट देणार असल्याचे सांगितले. ज्येष्ठ नागरिक कार्यालयात विविध उपक्रम घेतले जातात. विविध संघटनेच्या उत्कृष्ट कार्या बद्दल पदाधिकाऱ्यांचा सत्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, वाढदिवस साजरा करणे, नवीन अधिकाऱ्याचा सत्कार आदी कामे जातात. या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

तसेच गेवराई येथील मान्यवर ह भ प दिलीप घोगे महाराज व भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह डॉ. श्री हेमंत वैद्य, प्रतिनिधी दिव्य मराठी प्रा.सुनील मुंडे व झुंजार नेता प्रतिनिधी श्री राजेंद्र बर कसे, प्रतिनिधी लोक प्रभा, काझी अमान आदीनी कार्याचे कौतुक केले आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्राहक पंचायत महाराष्ट्र गेवराई अध्यक्ष प्रा.भानुदास फलके ,ऍडव्होकेट बी एम मुळे ,राजेंद्र सुतार ,प्रमोद कदम आधी प्रयत्न करीत असतात.





बीड कृषी उत्पन्न बाजार समिती येथे बीड नगरपरिषद निवडणूक मतदान यंत्र स्ट्रॉंग रूम येथे पोलीस बंदोबस्त व सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीखाली (छाया कृष्णा शिंदे)



**बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्रसिद्ध श्रीकृष्ण मंदिरात गुरुवारी श्री दत्त जयंती अत्यंत भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता तर फुलांच्या आकर्षक सजावटीमुळे संपूर्ण मंदिराला वेगळाच दिव्य आणि मंगलमय असा नजार मिळत होता.**



## उमेद पोर्टलवरील अडचणी वाढल्या; वक्फ संपत्ती अपलोडसाठी तारीख वाढवा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ डिसेंबर**

### खा.बजरंग सोनवणे यांची केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांच्याकडे मागणी

वक्फ संस्थांच्या संपत्तीचे ऑनलाईन नोंदणीकरण उमेद पोर्टलवर सुरू असताना गेल्या काही दिवसांपासून या पोर्टलला गंभीर तांत्रिक अडचणी येत असल्याने नोंदणीचे काम ठप्प झाले आहे. यामुळे वक्फ संपत्ती अपलोडसाठी अंतिम तारीख वाढवावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांची भेट घेत पत्राद्वारे केली आहे.



## ५ क्विंटल कापुस चोरीच्या लावलेल्या आरोपातून ५ जणांना अटक पुर्ण जामीन मंजुर-ॲड.सुर्यकांत पवार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ डिसेंबर**

गेल्या महिन्यात सुशी तांडा येथे राहत असलेल्या एकमेव आदिवासी गायकवाड कुटुंब यांच्यावर गावातील व्यक्तीने ५ क्विंटल कापुस चोरीचा गुन्हा दाखल केला होता सदर प्रकरणात १ ते ५ सर्व आरोपींनी न्याय साठी बीड कोर्टात अटक पुर्वक जामीन अँड सुर्यकांत पवार यांच्या माध्यमातून दाखल केले सदर प्रकरण हे जिल्हा सेशन कोर्ट बीड मा पाटवदकर साहेब यांच्या कोर्ट समोर चालले सदर कोर्ट समोर सरकार वकील यांनी त्यांची बाजु मांडली आणि आरोपी १ ते ५ तर्फे अँड सुर्यकांत पवार यांनी भक्कम बाजु मांडत सदर घटने पूर्वी सदर गुन्ह्यातील १ ते ५ आरोपींनी फिर्यादीच्या पतीवर atrocity चा गुन्हा दाखल केला आहे, आरोपी १ ते ५ यांनी वेळोवेळी त्यांच्या जीवितास धोका आहे व त्यांना गावातील लोकांपासून धोका आहे हे पोलीस स्टेशन गेवराई व जिल्हा पोलिस अधिक्षक यांना वेळोवेळी तक्रारी अर्ज दाखल केलेले सर्व पुरावे कोर्टा समोर दाखल करून,५ लोक ५०० किलो कापुस उचलुन नेहु शकत किंवा चोरू शकत नाही या कोर्टा समोर बाबी समोर आणुन दिल्यानंतर मा कोर्टाने सर्व रास्त विचार करून व दोन्ही बाजु एकुण सदर गुन्ह्यात आरोपी १ ते ५ यांना अटक पूर्व जामीन मंजुर केला आहे

# बीड येथून देवगिरी प्रांताची टीम पानिपत येथील १३व्या राष्ट्रीय महाअधिवेशनासाठी रवाना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ डिसेंबर**

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली आयोजित त्रयोदश राष्ट्रीय महाअधिवेशन हे पानिपत येथे ५ ते ७ डिसेंबर २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आले असून या महत्त्वपूर्ण अधिवेशनात सहभागी होण्यासाठी देवगिरी प्रांतातील अभ्यासकांची टीम आज बीड येथून वंदे मातरमच्या घोषात उत्साहपूर्ण वातावरणात रवाना झाली. या अधिवेशनाचे आयोजन श्री माधव जनसेवा न्यास, पट्टिकल्याणा, समालखा (पानिपत) येथे होत असून भारतीय इतिहास, संस्कृती आणि संविधान या विषयांवर राष्ट्रभरातील अभ्यासकांची मंथनसभा म्हणून हे अधिवेशन ओळखले जात आहे.

टीमच्या प्रस्थानावेळी ज्येष्ठ संघ स्वयंसेवक श्री. कुलदीप धुमाळ यांच्या उपस्थितीत कार्यक्रमास औपचारिक प्रारंभ झाला. त्यांनी स्वतः वंदे मातरमचे स्फूर्तिदायी गायन करून संपूर्ण वातावरण राष्ट्रभक्तीच्या भावनांनी भारावून टाकले. घोषणांचा जयघोष आणि प्रस्थानाच्या उत्सवी वातावरणामुळे संपूर्ण परिसरात प्रेरणादायी ऊर्जा पसरली. या प्रसंगी बीड शहरातील अनेक मान्यवरांनी स्वतः उपस्थित राहून टीमचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. यामध्ये डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी, अध्यक्ष, संस्कृत भारती, देवगिरी प्रांत; डॉ. चंद्रकांत गायकवाड, संघ कार्यकर्ते; डॉ. सुभाष जोशी, सहसचिव - सेवा भारती, देवगिरी प्रांत; डॉ. धनंजय रामदासी, सिमाताई जोशी, ज्योतीताई धुमाळे, ड. बाळासाहेब गिते आणि डॉ. भोगले यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. सर्वांनी संघटन आणि अभ्यास कार्याच्या



या महत्वपूर्ण प्रवासासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

अभ्यासदौऱ्यात सहभागी होणाऱ्या देवगिरी प्रांतातील कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण होते. या टीममध्ये नंदकिशोर झरीकर, एकनाथ जाधव, मुकुंद कुलकर्णी, बाबासाहेब शेप, कालीदास चिटणीस आदींचा सहभाग उल्लेखनीय आहे. एकूण ४६ अभ्यासक व कार्यकर्ते या अभ्यासयात्रेसाठी रवाना झाले असून, या दौऱ्याचा उद्देश पानिपत व उत्तर भारतातील ऐतिहासिक स्थळांचा प्रत्यक्ष अभ्यास करून इतिहासाचे वास्तव अनुभवणे हा आहे. यात्रेदरम्यान टीम चित्तोडगड किल्ला, पुष्कर सरोवर, जयपूर, कुरुक्षेत्र, दिल्ली (लाल किल्ला, अक्षरधाम), मथुरा, वृंदावन, आग्रा आणि उज्जैन या भारतीय इतिहास, संस्कृती व अध्यात्माचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महत्त्वपूर्ण स्थळांना भेट देणार आहे. इतिहासाचे प्रत्यक्ष निरीक्षण, स्थळपरिचय आणि घटनास्थळाचा अनुभव या माध्यमातून अभ्यासाला नवी दिशा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

अभ्यासदौऱ्याबाबत बोलताना डॉ. राधाकृष्ण जोशी यांनी सांगितले की इतिहासाचा अभ्यास हा तो ज्या भूमीवर घडला त्या भूमीवर अनुभवला तरच पूर्णत्वास जातो. ही यात्रा अभ्यासकांसाठी ज्ञान आणि अनुभवाचा अमूल्य संगम ठरणार आहे. तसेच डॉ. रवी सातभाई यांनी नमूद केले की पानिपतचा इतिहास हा भारतीय राजकीय आणि सांस्कृतिक घडामोडीतील टर्निंग पॉइंट आहे. त्यातील वास्तव समजून घेण्यासाठी गेल्या वर्षभरापासून या प्रवासाचे विशेष नियोजन करण्यात आले आहे.

या राष्ट्रीय महाअधिवेशनाचे विशेष आकर्षण म्हणजे परमपूजनीय डॉ. मोहन माधुकुर भागवत, सरसंघचालक - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांची उपस्थिती. तसेच भारताचे माननीय संस्कृती मंत्री श्री. गजानंद सिंह शेखावत हे विशिष्ट अतिथी, तर भारतीय इतिहास अनुसंधान परिषद (खउक्ठ) चे अध्यक्ष प्रा. रघुवेंद्र तंवर हे मुख्य वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. श्री. गोपाल नारायण सिंह हे मुख्य संरक्षक तर डॉ. देवी प्रसाद सिंह हे या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत.

या सर्वांची उपस्थिती आणि मार्गदर्शनामुळे हे अधिवेशन भारतीय इतिहासाच्या मूलभूत अभ्यासाला आणि नव्या इतिहासलेखनाला नवी दिशा देईल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली. देवगिरी प्रांताची टीम बीड येथून एकात्मता, अभ्यास आणि राष्ट्रभावनेच्या भावनेने पानिपतकडे रवाना झाली असून आगामी तीन दिवसांचे हे अधिवेशन अभ्यासकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे ठरणार आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सीसीटीएनएस कामगिरीमध्ये हिंगोली जिल्हा राज्यात प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ डिसेंबर**
सीसीटीएनएस कार्यप्रणाली ही महाराष्ट्रात सप्टेंबर २०१५ पासून चालु झालेली असुन त्यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील सर्व पोलिस स्टेशनचे ऑफलाईन/ ऑनलाईन कामकाज चालते. त्यामध्ये तक्रारदार यांची तक्रार घेवुन ती ऑनलाईन मध्ये गुन्हे दाखल करुन सर्व गुन्ह्याचा तपास हा वेळे मध्ये सीसीटीएनएस प्रणाली मध्ये भरण्यात येत असतो. तसेच या प्रणालीद्वारे आरोपींचा पुर्व इतिहास पडताळुन त्यांचेवर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येतात. हिंगोली जिल्हयामध्ये सीसीटीएनएस नोडल अधिकारी म्हणुन कमलेश मीना, अपर पोलीस अधिक्षक हिंगोली हे कामकाज पाहतात. कमलेश मीना, अपर पोलीस अधीक्षक हिंगोली यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन ला सीसीटीएनएस कामकाज करण्यासाठी एक किंवा दोन अंमलदार यांची सीसीटीएनएस पर्यवेक्षक म्हणुन नेमणुक करण्यात आली असुन सदर पर्यवेक्षक अंमलदार यांचे कामकाजाकडे लक्ष देण्यासाठी सीसीटीएनएस देखरेख अधिकारी म्हणुन नेमणुक केलेली आहे. सदर सीसीटीएनएस देखरेख अधिकारी वर सीसीटीएनएस पर्यवेक्षक यांना प्रत्येक म हिन्याला सीसीटीएनएस शाखा, हिंगोली येथे कार्यरत असलेले पोलीस हवालदार श्री. राजु पांडुरंग हमाने, पोलीस अंमलदार राहुल परमेश्वर तडकसे व महिला पोलीस अंमलदार पुजा सखाराम जाधव यांचे मार्फत सीसीटीएनएस कार्यप्रणाली तसेच सदर प्रणालीशी निगडित असलेले सर्व प्रकारचे पोर्टल जसे सीसीटीएनएस, आयसीजेएस, आयटीएसएसओ, क्रायमॅक, ईसाक्ष व इतर प्रकारचे पोर्टलवर सविस्तर मार्गदर्शन करुन प्रशिक्षण दिल्या जाते तसेच प्रणालीशी निगडित असलेल्या सर्व प्रकारच्या अडीअडचणी तात्काळ सोडवल्या जातात व सर्व पर्यवेक्षक यांना वेळोवेळी कामकाज करून घेण्याकरिता पाठपुरावा करण्यात येतो. त्यामुळे जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनचे कामकाज सुरळीत चालते.

श्रीकृष्ण कोकाटे पोलीस अधीक्षक, कमलेश मीना, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. मोहन भोसले स्थागुशा, सपोनी शिवसांब घेवारे स्थागुशा, सीसीटीएनएस शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय येथे कार्यरत असलेले पोलीस हवालदार राजु पांडुरंग हमाने, पोलीस अंमलदार राहुल परमेश्वर तडकसे व महिला पोलीस अंमलदार पुजा सखाराम जाधव यांनी जिल्ह्यातील सर्व सीसीटीएनएस पर्यवेक्षक/अंमलदार केशव पुंड, राम धुमाळे, पुजा पवार, गजानन शिंदे, भारत डाखुरे, नामदेव जाधव, मंगेश नरवाडे, गुरुपवार, अमोल अडकीने, केतन तायडे, विश्वनाथ दळवे, रमेश बोरकर, लक्ष्मन हागवने, मारोती परडे, शितल आगाशे सर्व पोस्टे प्रभारी अधीकारी, सर्व तपासीक अधिकारी/अंमलदार व सीसीटीएनएस पर्यवेक्षक व डयुटी अंमलदार या सर्वानी वेळेत सीसीटीएनएस कामकाज केल्याने गुन्हे अन्वेशण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे येथुन प्रत्येक महिन्यात सीसीटीएनएस कामकाज त्यामध्ये डाटा फिडिंग, विविध पोर्टल, ऑनलाईन कामकाज, चांगल्या कामगिरीच्या अहवालावरुन माहे ऑगस्ट २०२५ मध्ये २०१ पैकी २०१ गुण १००% टक्के कामगिरी केल्याने हिंगोली जिल्हा महाराष्ट्रामध्ये ५३ युनीट मधुन पहिला आला आहे. सीसीटीएनएस कार्यप्रणाली मध्ये हिंगोली जिल्ह्याची कामगिरी ही उल्लेखनिय झाल्याने अभिनंदन केले आहे. पोलीस अधीक्षक कोकाटे यांनी सर्व सीसीटीएनएस चे कामकाज करणारे अधिकारी व अंमलदार यांचे अभिनंदन केले. नांदेड परिक्षेत्राचे उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी श्रीकृष्ण कोकाटे आणि टीमचे अभिनंदन केले.

# शहरात ठिकठिकाणी श्री दत्त जयंतीचा उत्सव उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ डिसेंबर**
शहरातील विविध भागातील दत्त मंदिरात गुरूवार दि ४ डिसेंबर रोजी श्री दत्त जयंतीचा उत्सवा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भाविकांची मोठी गर्दी होती.

शहरातील मंगळवारा भागातील दत्त मंदिरात मागील आठवडाभरापासून गुरू चरित्र पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या पारायणाला मोठ्या संख्येने ब्रम्हवृंदांनी सहभाग घेतला. दररोज पंचपदी, त्रिपदी तसेच आरती, भिक्षा आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी श्री दत्ताची पालखीचे आयोजनही करण्यात आले होते. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

येथील शिवाजी नगर भागातील दत्त मंदिरातही श्रीगुरू चरित्र पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. दि ४ डिसेंबर रोजी गुरू चरित्र पारायणाची सांगता आणि श्री दत्त जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आरती, महापूजा आणि अभिषेकानंतर श्री दत्त जयंती साजरी करण्यात आली. महाप्रसादाचे वाटप यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती.

शहरातील खटकाळी बायपास येथील शक्तीब्रम्हाश्रम येथील दत्त मंदिरात मागील आठवडाभरापासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आज श्री दत्त जयंती निमित्त याठिकाणी दुपारी किर्तनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आरती, पंचपदी यासह विविध कार्यक्रमानंतर श्री दत्त जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी परिसरातील महिला, पुरूष तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळपासूनच श्री दत्ताच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. यावेळी महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.

# पोलिस ठाण्यात गोंधळ घालणाऱ्या २५ जणांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ डिसेंबर**
नगर पालिका निवडणुकीनंतर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या समर्थकांमध्ये तुफान हाणामारी झाली असून यामध्ये काहीजण गंभीर असल्यामुळे त्यांना उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. त्यानंतर रात्री ११ च्या सुमारास काहीजण पोलिस ठाण्यात येऊन गोंधळ घातल्या याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात २५ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून आजम कॉलनी परिसरात पोलिसांचा चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे.

हिंगोली नगर पालिकेच्या निवडणुकीसाठी दि २ डिसेंबर रोजी मतदान झाले होते. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आमनेसामने उभे होते. मतदानाच्या दिवशी आजम कॉलनी भागात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. मतदानानंतरही हे वातावरण तणावपूर्णच राहीले. दि ३ डिसेंबर रोजी संध्याकाळी जुन्या नगर पालिका कार्यालयाजवळ राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. झालेल्या तुफान हाणामारीत अनेकजण जखमी झाले असून काही जणांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना नांदेड येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे. या घटनेची माहीती मिळताच पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी जमादार संजय मार्के, अमजद यांच्यासह पोलिस कर्मचारी होते. कार्यकर्त्यांना पांगविण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. त्यानंतर हाणामारी करणाऱ्या काहीजणांनी रात्री उशिरा शहर पोलिस ठाण्यात गोंधळ घातला. पोलिस ठाण्यात गोंधळ घालणाऱ्या करणाऱ्यांवर जमादार आझरूझमा खान शफीउज खान पठाण यांच्या तक्रारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सय्यद जावेद सय्यद बाबू, साद अहमद, सय्यद जावेद राज, इद्रीस, बारी खान यांच्यासह २० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या धटनेनंतर शहरातील आजम कॉलनी आणि मस्ताशहा नगर भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे आणि पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिस पथके तयार करण्यात आले आहेत.



**हिंगोली– शहरात श्री दत्त जयंती उत्सव विविध ठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. येथील खटकाळी बायपास जवळील शक्तीब्रम्हाश्रम श्री दत्त मंदिरात दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विधीवत पूजा, आरती करीत श्री दत्त जयंती साजरी करण्यात आली. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### कृत्रिम बुध्दीमत्ता, सोशल मिडीया व नागरिकसेवा या विषयांवर निबंध स्पर्धा

हिंगोली–.महाराष्ट्र लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र प्रादेशिक शाखा मुंबईतर्फे 'कृत्रिम बुद्धीमत्तेचे युग', 'सोशल मीडिआ : आव्हाने आणि संधी', तसेच 'नागरिकांचे जीवन सुलभ करणे' या विषयांवर कै बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा २०२५–२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी निबंध मराठी किंवा इंग्रजी या भाषेत, निवडलेल्या विषयावर ३ हजार ते ५ हजार शब्दांच्या मर्यादेत लिहिणे आवश्यक आहे. निबंध विश्लेषणात्मक, संशोधनपर व पदव्युत्तर दर्जाचा असावा. निबंध फक्त कागदाच्या एकाच पृष्ठभागावर टंकलिखित करून, त्यावर केवळ टोपणनाव नमूद करावे. निबंधाच्या चार प्रती सादर करणे आवश्यक असून, स्पर्धकांनी निबंधावर स्वतःचे नाव किंवा आळख नमूद करु नये. निबंधाच्या प्रतींसोबत वेगळ्या लिफाफ्यात स्पर्धेचे नाव (मराठी व इंग्रजीत), स्पर्धकाचे टोपणनाव, पत्ता, संपर्क क्रमांक व ई–मेल आयडी नमूद करून पाठविणे आवश्यक आहे. या निबंध स्पर्धेत पहिले बक्षीस १० हजार, दुसरे बक्षीस ७ हजार ५००, तिसरे बक्षीस ५ हजार तसेच उत्तेजनार्थ २ हजार रुपये असे बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध तयार करून भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र प्रादेशिक शाखा, मुंबई– ४०००३२ येथे दि. २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पाठवावेत, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) अनिल माचेवाड यांनी केले आहे.

### कळमनुरी पालिका निवडणुकीवरून वाद

हिंगोली– कळमनुरी येथे पालिका निवडणुकीचय कारणावरून घरासमोर एकत्र आलेल्या १४ जणांच्या जमावावर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कळमनुरी पालिका निवडणुकीत नुकतीच मतदान प्रक्रिया पार पडली आहे. या मतदान प्रक्रियेच्या वेळी किरकोळ कारणावरून वादाला तोंड फुटत आहे. निवडणुकीत झालेल्या कुरबुरीचा राग काढण्यासाठी तसेच एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहरातील झमझम कॉलनी भागात मोहम्मद हानीफ यांच्या घरासमोर १४ जणांचा जमाव एकत्र आला. नगर पालिका निवडणुकीत पैसे वाटले व मारण्यासाठी गुंडे आणले असे आरोप करण्यात आले. याप्रकरणी मोहम्मद हानीफ यांनी कळमनुरी पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली आहे. यावरून पोलिसांनी नशु कुरेशी, निहाल कुरेशी, रिजवान कुरेशी, अरबाज कुरेशी, समीर कुरेशी, नदीम कुरेशी, इरफान कुरेशी, जिया कुरेशी, यासीन कुरेशी, अफरोज कुरेशी, मोहसीन कुरेशी, खाजा कुरेशी, अजमत बेग, आदील कुरेशी यांच्या विरूध्द दि ४ डिसेंबर रोजी पहाटे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक संतोष इंगळे, जमादार गजानन होळकर करीत आहेत.

### ७ वाहनांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैधवाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७ वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाई केली.

# परिस्थितीशी जूळवून घेणाराच आयुष्यात यशस्वी होतो– सीईओ विवेक गायकवाड




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ डिसेंबर**
बालगंधर्व, स्टीफन हॉकींग्ज, सुधा चंद्रण यांच्यासह विविध यशस्वी दिव्यांग व्यक्तीची यशोगाथा सांगून त्यांनी मुलांना प्रेरित केले. डार्विनचा जगण्याचा सिद्धांत ज्यांना दिव्य असे अंग प्राप्त आहें ते दिव्यांग असतात त्यामुळे आपण कुणासारखे बनण्यापेक्षा आपला एक वेगळाच आदर्श निर्माण करावा. सभोवतालच्या परस्थितीशी जुळवून घेणाराच आयुष्यात यशस्वी होतो. त्यामुळे तुम्ही सुद्धा दिव्यांगत्वाचा स्वीकार करून यशस्वी व्हा असा सल्ला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी दिला.

शहरातील शंकरराव चव्हाण उर्दू प्रा. शाळेत जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यावेळी दिव्यांग साक्षमीकरण अधिकारी गीता गुठ्ठे यांनी प्रास्ताविकपर उदभोदन केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी शासनाने जरी २०१६ चा दिव्यांग कायदा बनवला तरी त्याची योग्य अंमलबजावणी होणे गरजेचे आहें असे प्रतिपादन यावेळी केले.

तदनंतर विद्यार्थ्यांच्या जनजागरण रॅलीस गायकवाडांच्याहस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरवात करण्यात आली. विविध घोषणा देत रॅलीचा समारोप जि.प शाळेच्या मैदानावर करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विस्तार अधिकारी मधुकर राऊत, पकाणे, मुंढे यांनी परिश्रम घेतले. यावेळी सर्व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. रॅली नंतर विद्यार्थ्यांना खाऊचे वितरण करण्यात आले. सर्व शाळेमध्ये दिव्यांग दिनाच्या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले ज्यात लांब उडी, गोळाफेक, धावणे, पासिंग द बॉल इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या.

# शाळा बंद आंदोलनाला संस्थाचालकांचाही पाठींबा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ डिसेंबर**
राज्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या समन्वयाने ५ डिसेंबर रोजी हिंगोली सह संपूर्ण राज्यात शाळा बंद आंदोलन करण्यात येणार असून प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा आयोजन केलेले आहे. शाळा बंद आंदोलनाला आता संस्थाचालाकांनीही पाठींबा दिला आहे.

शिक्षकांना टीईटी परीक्षा देण्याचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा,अन्यायकारक संचमान्यता,रद्द करून यासाठी विद्यार्थी पट संख्येची अट शिथिल करावी,अंशतः अनुदानित या सह सर्वच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांना जुनी पेन्शन लागू करावी,शिक्षकेतर कर्मचारी यांना आश्वाशीत प्रगती योजना लागू करावी,स्वयंम अर्थसहाय्यीत शाळांना मान्यता देणे बंद करून मराठी शाळा वाचवाव्यात, शिक्षण विभागातील सर्व शिक्षक शिक्षकेतर रिक्त पदे तात्काळ भरावीत, सरसकट पदवीधर वेतनश्रेणी, वस्तीशाळा शिक्षकांची मागील सेवा गृहीत धरून त्यांना कायम करावे यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी दि ५ डिसेंबर रोजी शाळा बंदची हाक देण्यात आली असून सर्व शिक्षक संघटनांनी या आंदोलनाला पाठींबा दिला आहे. तसेच शिक्षकांनी शुक्रवारी सामुहीक रजा देत शाळा बंद आंदोलनात सहभाग घेतला आहे. तत्पूर्वी दि ३ डिसेंबर रोजी शिक्षणाधिकारी यांना मुख्याध्यापक संघाने निवेदन सादर केले आहे.

# सांदीपनी पब्लीक स्कूलची रक्षिता बकवाड हीची राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ डिसेंबर**
धुळे येथे दि २५ ते २७ नोव्हेंबर दरम्यान क्रीडा युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १४ वर्षाखालील वयोगटाची राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धा व राष्ट्रीय संघ निवड चाचणी यामध्ये सांदीपनी पब्लिक स्कूल, नांदेडची विद्यार्थिनी रक्षिता रविकुमार बकवाड हिने उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्र मुलींच्या संघात राष्ट्रीय शालेय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

रक्षिता ही सुमेध गायकवाड मार्गदर्शनाखाली सातत्याने सराव करीत असून तिचे वडील रविकुमार बकवाड स्वतः क्रीडा शिक्षक असल्याने तिला लहानपणापासूनच खेळाची आवड निर्माण झाली आहे. या निवडीबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, नांदेड जिल्हा नेटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीणकुमार कुपटीकर, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय बेतेवार, बालाजी शिरसीकर आदी मान्यवरांनी अभिनंदन करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे संचालक सुनिल राठोड, सहसंचालक मुकूल राठोड, प्राचार्या क्रांती कुलकर्णी, उपप्राचार्या हरप्रीत कौर सल्लागार केदार शर्मा प्रशासक मारोती मेखाले, क्रीडा शिक्षक भाऊराव राठोड तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी रक्षिता बकवाडचे कौतुक केले व तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. रक्षिता हिची ही कामगिरी केवळ शाळेसाठीच नव्हे तर संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरली असून तिच्या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रेम व स्पर्धात्मकता अधिक दृढ होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली

# वनहक्क धारकांना शासनाचा लाभ द्यावा– जिल्हाधिकारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ डिसेंबर**
अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासींच्या सामूहिक व वैयक्तिक वनहक्काच्यादाव्यांचा जलद निपटारा करून पात्र वनहक्क धारकांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळावा, यासाठी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिल्या. बैठकीदरम्यान वनहक्कासंदर्भातील जुने व नवीन दाखल दावे, सातबारा वाटपाची स्थिती, मोजणी पूर्ण झालेली तसेच मोजणीसाठी प्रलंबित प्रकरणे, फेरचौकशीसाठी पाठविण्यात आलेल्या प्रकरणांची प्रगती, तसेच अपील प्रकरणांबाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही यांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. वसमत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे फेरचौकशीसाठी पाठविण्यात आलेल्या दाव्यांची सद्यस्थिती, तसेच विभागीय वन अधिकारी यांच्याकडे पाठविलेल्या अपील व दाव्यांवरील अभिप्राय आणि अहवालाची स्थिती याबाबतही जिल्हाधिकारी गुप्ता यांनी माहिती घेतली. दाव्यांच्या निपटाऱ्यास गती देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. बैठकीस उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, विभागीय वन अधिकारी कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

# क्रीडा महोत्सव: विविध क्रीडा स्पर्धांना उत्साहपूर्ण सुरुवात

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ४ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आयोजित २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ ला आज (४ डिसेंबर) उत्साहपूर्ण सुरुवात झाली. व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, खो-खो, टेबल टेनिस, बॅडमिंटन, बुद्धिबळ आणि अॅथलेटिक्स क्रीडा प्रकारांच्या सामन्यांना राज्यभरातील २४ विद्यापीठांच्या खेळाडूंचा उल्लेखनीय प्रतिसाद लाभला. मैदानावर कौशल्य, वेग, रणनीती आणि जिद्दीची चमकदार मैफल रंगली.

**कबड्डी स्पर्धेतील रोमांचकारी सामने**

कबड्डी या क्रीडा प्रकारात आज एकापेक्षा एक चुरशीचे सामने खेळवण्यात आले. प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी अप्रतिम पकड, टाळ्या मिळविणारे चढाईचे डाव आणि तगडी बचावशैली सादर केली.

कबड्डी (मुली) या क्रीडा प्रकारात मुंबई विद्यापीठ, गडचिरोली विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई, कोल्हापूर विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठ तर कबड्डी (मुले) या क्रीडा प्रकारात पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, डॉ. होमी भाभा विद्यापीठ, मुंबई, जळगाव विद्यापीठाच्या संघानी विजय मिळवत प्रभावी कामगिरी नोंदवली.

**खो-खो स्पर्धेत रोमांचक सामन्यांची मालिका यजमान नांदेड विद्यापीठाचा थरारक विजय**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवांतर्गत खो-खो स्पर्धेतील मुले व मुलींचे सामने अतिशय रोमांचक झाले. प्रत्येक सामन्यात खेळाडूंच्या चपळाई, वेग आणि हुशार रणनीतीची विलक्षण जुगलबंदी पाहायला मिळाली.

खो-खो (मुले) या स्पर्धेच्या चुरशीच्या सामन्यांत विजयी संघांची चमक पहावयास मिळाली. यामध्ये यजमान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, अमरावती विद्यापीठाच्या संघांनी तर खो-खो (मुली) या स्पर्धेत मुंबई विद्यापीठ, महिला विद्यापीठ, मुंबई, पुणे विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठाच्या संघांनी विजय मिळविला.

**बास्केटबॉल स्पर्धेत विजयाची जिद्द आणि संघभावनेचे उत्तम प्रदर्शन**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा महोत्सवातील बास्केटबॉल स्पर्धेला आज उत्साहपूर्ण सुरुवात झाली. मैदानावर उतरताच खेळाडूंनी अचूक पासिंग, वेगवान ड्रिब्लिंग आणि प्रभावी शूटिंगची चमकदार मेजवानी साकारली. राज्यातील विविध विद्यापीठांतील खेळाडू संघांनी विजयाची जिद्द आणि संघभावनेचे उत्तम प्रदर्शन करत स्पर्धेची रंगत उंचावली. पहिल्याच दिवसापासून



सामन्यांमध्ये चुरस वाढल्याने प्रेक्षकांचा उत्साह आणि टाळ्यांचा कडकडाट सतत दुमदुमत राहिला.

बास्केटबॉल (मुली) स्पर्धेत अमरावती विद्यापीठ, लोणेरे विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ, आरोग्य विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाच्या संघांनी तर बास्केटबॉल (मुले) स्पर्धेत कोल्हापूर विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ, होमी भाभा विद्यापीठ, मुंबई आणि नागपूर विद्यापीठाच्या संघांनी विजय मिळवत प्रभावी कामगिरी केली.

**व्हॉलीबॉल स्पर्धेला जोरदार सुरुवात दमदार सर्व्हिस आणि शक्तिशाली स्मॅशेसची आतषबाजी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा महोत्सवातील व्हॉलीबॉल स्पर्धेला आज उत्साहपूर्ण आणि ऊर्जावान सुरुवात झाली. कोर्टावर खेळाडूंच्या दमदार सर्व्हिस, अचूक सेटिंग आणि विजेच्या वेगाने होणाऱ्या स्मॅशेसमुळे सामन्यांना सुरुवातीपासूनच तापलेले वातावरण लाभले. विविध विद्यापीठांतील संघांनी संघभावना, रणनीती आणि कौशल्याचा अप्रतिम संगम साधत रोमांचक खेळीची मेजवानी सादर केली. प्रेक्षकांच्या टाळ्या, आरोळ्या आणि उत्साहामुळे पहिलाच दिवस व्हॉलीबॉलच्या थराराने दुमदुमला.

व्हॉलीबॉल (मुली) स्पर्धेत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, पुणे विद्यापीठ, महिला विद्यापीठ, मुंबई, राहुरी विद्यापीठ तर व्हॉलीबॉल (मुले) स्पर्धेत लोणेरे विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाच्या संघाने विजय मिळविला.

**टेबल टेनिस स्पर्धेची सुरुवात चेंडूच्या चपळ फटक्यांनी रंगली मैफल**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा महोत्सवातील टेबल टेनिस स्पर्धेला आज उत्साहपूर्ण सुरुवात झाली. टेबलावर चेंडूची वीजवेगाने होत असलेली देवाणघेवाण, खेळाडूंचे अचूक स्मॅशेस, नियंत्रित स्पिन आणि तांत्रिक कौशल्य पाहून मैदानात थरार निर्माण झाला. राज्यभरातील विद्यापीठांमधून आलेल्या खेळाडूंनी पहिल्याच फेरीपासून प्रभावी कामगिरी करत स्पर्धेची रंगत उंचावली. प्रत्येक पॉईंटसाठीची धडपड आणि उत्कृष्ट रॅलींनी प्रेक्षकांचा उत्साह दुणावला. टेबल टेनिस (मुले) स्पर्धेत राहुरी विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाने विजय मिळविला.

**बॅडमिंटन स्पर्धेला दमदार सुरुवात**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा महोत्सवातील बॅडमिंटन स्पर्धेला आज जलद आणि उत्साहपूर्ण सुरुवात झाली. कोर्टावर शटलकॉर्कचे वेगवान उड्डाण, खेळाडूंचे फटकेबाज स्मॅशेस, अचूक ड्रॉपशॉट्स आणि चपळ प्रतिक्रिया पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. राज्यातील विविध विद्यापीठांतील खेळाडूंनी पहिल्याच फेरीपासून स्पर्धात्मक खेळाची उज्ज्वल झलक दाखवत स्पर्धेची रंगत अधिकच वाढवली. प्रत्येक रॅलीतून कौशल्य, आत्मविश्वास आणि जिद्दीची मैफलच रंगली.

बॅडमिंटन (मुली) स्पर्धेत नांदेड विद्यापीठ, अमरावती विद्यापीठ, महिला विद्यापीठ, मुंबई आणि बॅडमिंटन (मुले) स्पर्धेत नांदेड विद्यापीठ, एच.एस.एम.सी. विद्यापीठ, मुंबई, मुंबई विद्यापीठने विजय मिळविला.

क्रीडा महोत्सवाचा पहिला दिवस राज्यातील तरुण खेळाडूंच्या क्रीडाप्रेम, जिद्द आणि हार न मानणाऱ्या वृत्तीने उजळून निघाला. पुढील काही दिवसांतही अनेक रोमांचक सामने रंगणार असून क्रीडा रसिकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## श्री दत्तजयंती यात्रा महोत्सवात नगर पंचायतकडून पार्किंग व स्वच्छतेवर भर

**माहूर**-माहूर येथे सुरू असलेल्या दत्त जयंती यात्रेनिमित्त माहूर नगर पंचायतच्या वतीने पार्किंग, पाणीपुरवठा तसेच स्वच्छतेवर विशेष भर देण्यात येत आहे. भाविकांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला असून तेथून सातत्याने सूचना व माहिती देण्यात येत आहे.




आज दत्त जयंतीचा प्रमुख दिवस असल्याने शहरात लाखोंच्या संख्येने भाविक दाखल झाले. त्या अनुषंगाने नगराध्यक्ष फिरोज दोसानी, मुख्याधिकारी विवेक कांदे, कार्यालय अधीक्षक संदीप गजलवाड, लेखापाल विशाल मरेवाड व अभियंता विशाल ढोरे यांनी विविध वाहनतळांची पाहणी करून व्यवस्थेचा आढावा घेतला.या वेळी नगरसेवक इरफान सय्यद, रफीक सौदागर, विजय शिंदे, धनंजय कळस्कर, सुरेंद्र पांडे, बसवंत पाटील, नय्युम शेख व पंकज लोंढे उपस्थित होते. दिनांक ३० नोव्हेंबर पासून माहूर गडावरील दत्तशिखर संस्थान येथे पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला असून मंगळवारपासून भाविक मोठ्या संख्येने माहूर शहरात दाखल होत आहेत. आज या यात्रोत्सवाचा मुख्य दिवस असल्याने भाविकांची मोठी गर्दी माहूरगडासह शहरात उसळल्याच्यापार्श्वभूमीवर स्वच्छता व्यवस्था, पाण्याची सोय, पार्किंग नियोजन तसेच येणाऱ्या भाविकांना मार्गदर्शन करण्यासाठी नियंत्रण कक्षातून सातत्याने सूचना देण्यात येत असल्याचे नगर पंचायत कर्मचाऱ्यांनी सांगितले.या संपूर्ण व्यवस्थेची पाहणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी आणि मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी करून समाधान व्यक्त केले.

## अपघातात शिक्षक जखमी

**इस्लापूर**-आदिवासी आश्रम शाळेचे अधीक्षक ( शिक्षक )किनवट आदिवासी ऑफिसला कामासाठी जात असता सावरगावच्या पुढे किनवट महामार्गावर कार ला मागून धक्का दिल्याने कारचालकाचा संतुलन बिघडल्याने कार तीन पलट्या खाल्लयामुळे चार शिक्षकांना जबर मार लागला स्थानिक च्या नागरिकांनी वेळेवर गाडीचा दरवाजा तोडून सगळ्यांना बाहेर काढून १०८ ने तुरंत ईस्लापूर येथील आरोग्य केंद्रात आणून त्यांच्यावर उपचार केला असून सदरील अपघाताची तक्रार



अद्याप इस्लापूर ठाण्यात आली नसल्याची माहिती आहे .किनवट जाणाऱ्या महामार्ग सावरगावच्या समोर आज एका कंटेनर ने कार क्रमांक एम एस २६ बीसी ५४६३ या कार ला रनिंग मध्ये कंटेनर ने मागुन धक्का दिल्याने कार चालकाचा संतुलन बिघडल्याने रोडच्या डाव्या साईडला सदरील कार तीन पलट्या खाल्याची घटना घडली आहे सदरील अपघात झाल्याने कंटेनरचा चालक घटनास्थळावरून पसार झाला . कार मधील १)उत्तम लालू वाघमारे अधीक्षक वय ५३ वर्ष रा . मुळझरा , २ ) गंगाधर शंकर वाघमारे वय ५० वर्ष रा .रावणपुरा ता .उदगीर ३ ) सुभाष नामदेव वाठोरे वय ५८ रा . महादापूर ता हिमायतनगर , ४ ) शेषेराव उत्तम पवार वय ३५ रा . डोंगरगाव यांना गाडी पलटी खाल्याने मार लागला सावरगाव येथील स्थानिक नागरिकांनी वेळेवर कार चा दरवाजा तोडून सदरील लोकांना बाहेर काढले व १०८ क्रमांकावर फोन करून सर्वांना इस्लापूर येथील आरोग्य केंद्रात दाखल करण्यात येऊन डॉ ऋषिकेश निकम , यांनी जखमीवर उपचार केले.


### जाहिर प्रगटन

नोंदीचा प्रकारःखरेदी
माहिती मिळलेचा दिनांकः२७/११/२५
फेरफाराचा दि.२८/११/२५

लिहून देणारःकैलास सटवाराव कदम,भगवानराव सटवाराव कदम,मीनाबाई आबासाहेब कदम,वंदना उत्तमराव देशमूख रा.भोकर(खाता क्र.९०३)गट क्र./सर्व्हे क्र.६०१लागवडी योग्य क्षेत्र ०.४६६५ हे.आर.चौ.मी.पैकी लागवडी योग्य क्षेत्र०.०१६५हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.त्यांनी सदरील गट क्र.६०१ मध्ये प्लॉटिंग असून मूळ मालक कै. सटवाराव भूजंगराव कदम यांनी हयात असताना दस्त क्र.१०७४ दि.२१/०७/२००६ रोजी गट क्र.६०१ मधील क्षेत्र ०.०१६५ उत्तम लक्ष्मण शिरमोड यांनी विक्रि केला होता आज रोजी त्यांच्या वारसाच्या नावे सामाईक क्षेत्र आहे करिता ग्राम महसूल अधिकारी यांनी जायमोक्यावर जाऊन पंचसमक्ष पंचनामा केला करिता नोंद घेण्यात आली मंजूरीस्तव सादर

लिहून घेणारःउत्तम लक्ष्मण सिरमोड(खाता क्र.११२२०)गट/सर्व्हे क्रमांक ६०१ लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१६५ हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर. चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक१०७४दिनांक २१/०७/२००६ प्रमाणे रक्कम रुपये ६५००० घेऊन खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव गाव नमूना नं.७/१२वर दाखल केले.ज्या अर्थी तूमचा उक्त फेरफारात हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन फेरफार नोंदवहीवरुन मला वाटते ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदीसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे.ग्राम महसूल अधिकारी भोकर यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे ग्रहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर**



### टि.सी. हरवली

माझी जळबा केरबा मेटाले यांची BCA पासची टी सी बाळापूर ते हदगांव प्रवास दरम्यान हरवली आहे. कुणास सापडल्यास संपर्क करावा.

**संपर्क**
**जळबा केरबा मेटाले,**
**रा. तामसा, ता. हदगाव**


## मुदखेड येथील केंद्रीय प्रशिक्षण संस्थेत स्वच्छ भारत अभियान मोहीम




**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ४ डिसेंबर-**

केंद्रीय प्रशिक्षण संस्था, सीआरपीएफ, मुदखेड, संस्थेचे पोलीस महानिरीक्षक आणि प्राचार्य ख्वाजा सज्जनुद्दीन यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२५ या कालावधीत भारत सरकारद्वारे राबविण्यात येणारी स्वच्छ भारत अभियान-२०२५ ही मोहीम उत्साहाने आयोजित करत आहे. या कार्यक्रमांतर्गत, संस्था स्वच्छता प्रतिज्ञा, कॅम्पस स्वच्छता, रॅली, जागरूकता कार्यक्रम आणि प्लास्टिकमुक्त मोहिमा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करत आहे. या संदर्भात, दि.०२ डिसेंबर रोजी मुदखेड बाजारपेठ परिसरात एक जागरूकता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये संस्थेत उपस्थित असलेले अधिकारी, अधीनस्थ, सैनिक आणि प्रशिक्षणार्थी उत्साहाने सहभागी झाले होते.

या प्रसंगी, पोलीस महानिरीक्षक आणि केंद्रीय प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, मुदखेड, ख्वाजा सजनुद्दीन यांनी स्वच्छता मोहिमेचे स्पष्टीकरण देताना सांगितले की, स्वच्छ वातावरणातच निरोगी शरीर आणि मन विकसित होते. स्वच्छता राखल्याने रोगांचा प्रसार रोखला जातो, पिण्याचे पाणी आणि अन्न दूषित होते आणि पर्यावरणावर कोणताही प्रतिकूल परिणाम होत नाही. यामुळे आनंदी आणि निरोगी मानवी जीवनाला चालना मिळते. म्हणूनच, स्वच्छता मानवतेसाठी प्रत्येक प्रकारे आवश्यक आहे. आपण आणि आपले कुटुंबीय निरोगी राहावे म्हणून स्वतः मध्ये आणि आपल्या परिसरात स्वच्छता राखणे हे भारतातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

या प्रसंगी, अरुण कुमार, उपकमांडंट, करणजीत सिंह सहाय्यक कमांडंट, ए.एस. आर.के. चंदर सहाय्यक कमांडंट/पीएस आणि ४० अधीनस्थ अधिकारी, १५० इतर पदांचे, २५० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## शेतीपंपांना दिवसा वीज पुरवठ्याबाबत खा. अशोक चव्हाण यांनी केंद्राचे वेधले लक्ष

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ डिसेंबर-**

शेतकऱ्यांवरील वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांची वाढती संख्या लक्षात घेता केंद्र सरकारने देशातील सर्व राज्यांशी समन्वय साधून शेतीपंपांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्याबाबत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी आज संसदेचे लक्ष वेधले.

राज्यसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात मानववन्यप्राणी संघर्षाबाबत खा. सी. षण्मुगम यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर चर्चेत सहभाग घेताना खा. चव्हाण बोलत होते. शेतकऱ्यांवर होणाऱ्या वन्यप्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांविषयी चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की, साधारणपणे कृषीपंपांना रात्री वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी अंधारात शेतात जावे लागते आणि या वेळेत वन्यप्राण्यांच्या हल्ल्याची शक्यता अधिक असते.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राज्यांशी समन्वय साधून शेतीपंपांना दिवसा वीजपुरवठा करण्याचा निर्णय घेतल्यास अशा हल्ल्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते, अशी सूचना त्यांनी मांडली. याशिवाय वन्यप्राणी शेतात घुसून पिकांची मोठ्या प्रमाणात हानी करतात, त्यामुळे वनक्षेत्रालगतच्या शेतीभागांत कुंपण उभारण्यासारख्या उपाययोजनांची गरज असल्याचेही खा. चव्हाण यांनी नमूद केले.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी खा. अशोकराव चव्हाण यांच्या सूचनेचे स्वागत केले. वनक्षेत्रांच्या सीमेजवळ मानवी वस्तीमध्ये हल्ल्याच्या घटना वाढत असतील, तर आवश्यकतेनुसार असे भाग निश्चित करून तिथे वन्यजीव व्यवस्थापन योजनेंतर्गत सीमांकन केले जाते, असे ते म्हणाले.

## निवासी मूकबधिर विद्यालयात दिव्यांग दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ४ डिसेंबर-**

दि.३ डिसेंबर हा दिवस जागतिक अपंग दिवस म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने मुदखेड शहरातील निवासी मुकबधिर विद्यालयात दि.३ डिसेंबर रोजी दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम अपंगाचे जनक डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर मुदखेड शहरांमध्ये प्रमुख मार्गाने रॅली काढण्यात आली. यावेळी निवासी मुकबधिर शाळेचे मुख्याध्यापक एच.एस. कवलवाड,कला शिक्षिका एस.एस.सूर्यवंशी, कलाशिक्षक बी.एस.वाघ, विशेष शिक्षक जी.व्ही.बामणे,विशेष शिक्षक एस.आर. हजारे, कनिष्ठ लिपीक के.एल. जामुंदे,काळजीवाहक डी. जी.हासेवाड,सेवक जी.एम. शिंदे, स्वयंपाकिंन एन.एस.वाडेकर,यासह आदिंची उपस्थीती होती.

## ग्रामविकास अधिकारी निर्मल यांच्या चौकशीची आ. कोहळीकर यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ४ डिसेंबर-**

हदगाव तालुक्यातील ग्रामविकास अधिकारी यांच्या भ्रष्टाचारी व हुकूमशाहीचा फटका ग्रामीण भागातील नागरिकांना बसत असून अनेक छोटे - मोठे कामासाठी संबंधित अधिकारी नागरिकांकडून आर्थिक मागणी करत असल्याची धक्कादायक घटना घडली असून याची दखल खुद्द हदगाव - हिमायतनगरचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी घेतली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद . नांदेड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे चिंचगव्हाण ता. हदगाव येथील ग्रामविकास अधिकारी नामदेव निर्मल यांची तात्काळ चौकशी करून निलंबनासह शिस्तभंगाची कारवाईची मागणी करण्यात आली असून यामुळे भ्रष्टाचारी ग्रामविकास अधिकारी यांच्यामध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

हदगाव तालुक्यातील ग्रामविकास अधिकारी यांनी अक्षरशा कहर माजविला आहे कोणतेही काम असो अथवा विविध योजना अंतर्गत मिळणारे लाभ असो याकरिता सरळ- सरळ पैशाची मागणी होत असते अशी नेहमीच जनतेतून ओरड होत असताना याची दखल घेऊन आ. कोहळीकर यांनी थेट मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड यांना निवेदनाद्वारे ग्रामविकास अधिकारी नामदेव निर्मळ हे लहान मोठ्या कामांसाठी संबंधित अधिकारी नागरिकांकडून आर्थिक मागणी करत असल्याची गंभीर स्वरूपाची माहिती मिळाली असून या सर्व प्रकरणाची सखोल व तात्काळ चौकशी करण्यात यावी चौकशीत दोषी आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनासह आवश्यक कायदेशीर व शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

## जागतिक दिव्यांग दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ डिसेंबर-**

महावितरणच्या नांदेड परिमंडल कार्यालयात बुधवार (दि.३ डिसेंबर) रोजी जागतिक दिव्यांग दिन समारंभपूर्वक साजरा करण्यात आला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी मुख्य् अभियंता श्री राजाराम माने उपस्थित होते.

दिव्यांग असूनही महावितरणमध्येच नव्हे तर सर्वच क्षेत्रात दिव्यांग व्यक्ती चांगले कार्य करतात. त्यांच्या कार्यालयाचे कौतुक करुन त्यांच्यात आत्मबल आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी दिव्यांग दिन साजरा करण्यात येतो. असे सांगत मुख्य अभियंता राजाराम माने यांनी शुभेच्छा दिल्या.

## नरसी येथील मूक-बधिर विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा




**तभा वृतसेवा**
**नायगाव , दि. ४ डिसेंबर-**

नायगांव तालुक्यातील जय मल्हार शिक्षण प्रसारक मंडळ सावरगाव (पीर) संचलित निवासी मूक-बधिर विद्यालय, नरसी येथे जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात, आनंदाने आणि समावेशनाच्या भावनेने साजरा करण्यात आला. दिनांक ३ डिसेंबर रोजी सकाळी शाळेच्या प्रांगणात मुख्याध्यापक रामदास देशमुख यांच्या हस्ते डॉ. हेलेन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यानंतर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्या च्या उद्देशाने आकर्षक रॅली चे आयोजन करण्यात आले. शाळेच्या परिसरात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सह भागातून क्रीडास्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या कौशल्यपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांचे मने जिंकले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या मुख्याध्यापक देशमुखांनी विद्यार्थ्यांना फळे व शैक्षणिक साहित्य वाटप करून त्यांचे मनोबल उंचावले. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा सन्मान आणि प्रोत्साहन देण्याच्या हेतूने आयोजित केलेला हा उपक्रम विशेष ठरला.

या कार्यक्रमास गिरी सर, गवळे सर, अडबलवार सर, बरशमवार सर, पांचाळ मॅडम, अक्यमवार सर आणि डुमने सर यांची उपस्थिती व सहकार्य लाभले. सर्व शिक्षकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

नरसीच्या मूक-बधिर विद्यालयात साजऱ्या झालेल्या उपक्रमातून समावेशकता, संवेदनशीलता आणि सकारात्मकतेचा सुंदर संदेश नरसीसह पंचक्रोशीतील समाजामध्ये पोहोचला.

## मराठी नाट्य स्पर्धेच्या नांदेड केंद्राचा निकाल जाहीर ; नांदेड केंद्रातून 'संपूर्ण' हे नाटक प्रथम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ डिसेंबर-**

६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत नांदेड केंद्रातून राजीव गांधी युवा फोरम, परभणी या संस्थेच्या संपूर्ण या नाटकाला प्रथम पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक श्री. बिभीषण चवरे यांनी आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या नाटकाची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे-

तन्मय गृप, नांदेड या संस्थेच्या अंधारयात्रा या नाटकास द्वितीय पारितोषिक तसेच स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या संस्थेच्या तो ती आणि मनोहर या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. दिग्दर्शनः प्रथम पारितोषिक विजय करभाजन (नाटक-संपूर्ण), द्वितीय पारितोषिक जगन्नाथ चितळे (नाटक-अंधारयात्रा), तृतीय पारितोषिक अतुल साळवे (नाटक- तो ती आणि मनोहर) प्रकाश योजना प्रथम पारितोषिक माकिणचंद थोरात (नाटक- तो ती आणि मनोहर), द्वितीय पारितोषिक प्रतिभा शेंडे (नाटक-स्वप्नपंख), तृतीय पारितोषिक अनिल पांडे (नाटक-संपूर्ण) नेपथ्य प्रथम पारितोषिक दिनेश कवडे (नाटक-स्वप्नपंख), द्वितीय पारितोषिक अमोल गादेकर (नाटक अंधारयात्रा), तृतीय पारितोषिक किशोर पुराणिक (नाटक-ते दिवस) रंगभूषा प्रथम पारितोषिक गजेश्विनी देलमाडे (नाटक अंधारयात्रा), द्वितीय पारितोषिक रेवती पांडे (नाटक-ते दिवस) तृतीय पारितोषिक अर्चना जिरवणकर (नाटक-ब्रम्हदंद्व) संगीत दिग्दर्शनः प्रथम पारितोषिक मयंक परळीकर (नाटक-अस्वस्थ वल्ली), द्वितीय पारितोषिक अतुल साळवे (नाटक- तो ती आणि मनोहर), तृतीय पारितोषिक त्र्यंबक वडसकर (नाटक-ते दिवस) वेशभूषाः प्रथम पारितोषिक नेहा चितळे (नाटक-अंधारयात्रा), द्वितीय पारितोषिक रेणूका अंबेकर (नाटक-ते दिवस), तृतीय पारितोषिक यश वाळके (नाटक-अस्वस्थ वल्ली) उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक किशोर पुराणिक (नाटक-संपूर्ण) व अर्चना चिक्षे (नाटक-संपूर्ण), अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे विजय गजभारे (नाटक- तो ती आणि मनोहर), त्रिंबक मगरे (नाटक-नटसम्राट), मधुकर उमरीकर (नाटक-उद्रेक), अक्षद चंद्रवंशी (नाटक अंधारयात्रा), स्वाती देशपांडे (नाटक-ब्रम्हदंद्व), ऐश्वर्या डावरे (नाटक-अस्वस्थ वल्ली), सुनंदा दिघोळकर (नाटक-उद्रेक), सई चिटणीस (नाटक- ते दिवस)

दि. १६ नोव्हेंबर, २०२५ ते २७ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत शंकरराव चव्हाण नाट्यगृह, नांदेड येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण १० नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धे साठी परीक्षक म्हणून श्री. प्रकाश खोत, श्री. अविनाश कोल्हे आणि प्रतिभा टेटू यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या नाटकांच्या संघांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले.

राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सहभागी झालेल्या सर्व संस्था आणि कलाकार यांनी मेहनत घेऊन सादर केलेल्या सर्व दर्जेदार नाटकांना प्रेक्षकांनी चांगली दाद दिली. भविष्यातही संस्था व कलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी व्यक्त केलेली आहे.